# झांशीची संग्रामदेवता.

म. ग्रं. सं. ठाणे
विषय —
सं. न.

आवृत्ति ३ री.

REFBK-0003970

डॉ० तिवारी.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्रं.
ठाणे

ॐ नमश्चंडिकायै

झांशीची

# संग्रामदेवता

## राणी लक्ष्मी

लेखक

दु. आ. तिवारी—जळगांव

ग्रंथ संग्रहालय ठाणे

आवृत्ति तिसरी

१९२९ डिसेंबर

( हक्क ग्रंथकर्त्याकडे )

या आवृत्तीचे सोल एजंट:—

दत्तात्रय कंपनी बुकडेपो जळगांव-खान्देश.

किंमत दहा आणे.

मुद्रक:—

नामदेव माधव नेमाडे

मालक—श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेस जळगांव.

# विषय-सूचि.

विषय

१ चरित्र.

२ प्रस्तावना.

३ निवेदन.

४ अभिप्राय.

REFBK-0003970

पृ. प्रसिद्धीचें स्थळ.

५ आवडती माझी झांशी .... १ स्वराज्य.

६ मर्दानी झांशीवाली .... .... ४ चित्रमयजगत्.

७ घनगर्ज गर्जली तोफ .... १३ लोकमित्र.

८ फेकला तटाहुन घोडा .... १८ महाराष्ट्र-शारदा

९ झांशीची बीजन झाली .... २३ स्वराज्य.

१० सांभाळा ही तलवार........ २७ ,,

११ काल्पीस करी कल्पांत .... ३१ महाराष्ट्र-शारदा

१२ पळविला वीर बिदुलेने .... ३९ स्वराज्य.

१३ राणीचा रणकल्लोळ... ... ४५ ,,

१४ शेवटची संगरलीला.... .... ५१ ,,

# चित्र-सूचि.


| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमंत दामोदरराव गंगाधरराव झाशींवाले (राणी लक्ष्मीबाईचे दत्तकपुत्र) | चरित्रा नंतर |
| २ | श्रीमंत. चिंतामणराव मोरेश्वर तांबे. (राणी साहेबांचे सापत्नबंधु) | चरित्रा नंतर |

पृष्ठांक

३ देणार नाहिं कोणाशी-आवडती माझी झांशी.... १

४ किल्ल्यांतुन बाहिर आली-मर्दानी झांशीवाली.... ९

५ फेकला तटाहुन घोडा... .... .... .... २०

६ उमद्या घोड्याच्या टापा-'खाड खाड'— उडवित आली.... ३६

७ हननोद्यत करचंडीचा-नाचे नित शीर्षावरती.... ४२

८ दौलतिच्या आधारांनो!-व्हा पुढें राष्ट्रभक्तांनो ४९

९ भ्रुकुटी वरती चढलेली-डोळ्यात खून भरलेला ५४

१० 'राणी लक्ष्मीबाई शत्रुसैन्याची फळी फोडून गेल्या' ५६

# झांशीची संग्रामदेवता!

## महाराणी लक्ष्मीबाईचें संक्षिप्त चरित्र

### पूर्ववृत्त:—

सातारा जिल्ह्यात वाई क्षेत्रात राहणारे कृष्णराव तांबे हे कऱ्हाडे ब्राह्मण असून त्यास पेशवाईत मामलतीचा अधिकार होता. त्याचे पुत्र बळवतराव हे रावबाजीच्या वेळीं शूर सरदार ह्मणून गणिले जात. बळवतरावास मोरोपंत व सदाशिवराव असे दोन पुत्र होते. त्यांतून सदाशिवराव पूर्वीच वारले. मोरोपंतांच्या पत्नी भागीरथीबाई ह्मणून होत्या. या दंपत्याच्या पोटीं समरधुरंधर अशा महाराणी लक्ष्मीबाई यांचा जन्म ता० १९।११।३५ रोजीं काशींत झाला. त्यांच्या जन्मानंतर ३।४ वर्षांनीच त्यांच्या मातोश्री परलोकवासी झाल्या. तेव्हां मोरोपंत रावबाजीबरोबर ब्रह्मावर्ती जाऊन राहिले होते. रावबाजीचें चिरंजीव नानासाहेब तसेंच रावसाहेब हे राणीसाहेबांचे लहानपणचे खेळगडी होत. घोड्यावर बसणें, तरवार फेरणें, दौड मारणें वगैरे मर्दानी शिक्षण त्यांस लहानपणींच अनायासें मिळालें. त्यांचें माहेरचें नांव मनुताई असें होतें, परंतु त्यांचें सौंदर्य व नैसर्गिक स्वातंत्र्यप्रीति यामुळें त्या सर्वांस फार आवडे.

3८७०

असत, ह्मणून त्याचे प्रेमीजन त्यास लहानपणीं कधीं कधीं '**छबेली**' ह्मणून संबोधित.

एकदा दसऱ्याच्या स्वारीच्या वेळीं नानासाहेब राव-साहेब हे आपले सवगडी अंबारीच्या हत्तीवर बसून निघालेले पाहताच या छबेलीनें आपणासही हत्तीवर बसविण्याचा आग्रह धरिला मोरोपतानीं तिची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण तिची समजूत काही केल्या होईना. शेवटीं ते त्रासून ह्मणाले "**अग तुझ्या नशिबीं हत्ती कोठून येणार !**" त्यावर त्या सुभगेनें तात्काळ उत्तर दिलें, "**कां बरें ? एक सोडून दहा हत्ती आहेत माझ्या नशिबीं !**" तिच्या ह्या उत्तरानें त्यावेळीं सर्वांना कौतुक वाटलें. पण तिची स्वतः विषयींची ही भविष्यवाणी पुढें खरी झाली.

**तात्यादिक्षित** नावाच्या प्रसिद्ध ज्योतिषानी मनुबाईची जन्मपत्रिका पाहून '**ही खचित राणी होणार ?**" असें भविष्य वर्तविलें होतें. व त्याप्रमाणें पुढें खरोखरच **झांशीचे संस्थानिक गंगाधरराव** याच्याशीं त्याचा विवाह होऊन सन १८४२ त मनूबाई ह्या राणी लक्ष्मीबाई झाल्या. आणि ह्याच लक्ष्मीनें इ. सन १८५७ त भारताच्या स्वातंत्र्य-संग्रामात उडी घेऊन दिगंत कीर्ति मिळविली.

## मेरी झांशी नहिं दूंगी !

लग्नानंतर ११ वर्षांनीं (सन १८५३) गंगाधरपंत वारले. त्यांस औरस पुत्र नव्हता. ह्मणून त्यांनीं देहावसानापूर्वी

**दामोदरपंतास** दत्तक घेतलें होतें. 'माझा दत्तक पुत्र मंजूर करा' अशी त्यानीं **रेसिडेंट एलिस** याची काकुळत केली व प्राण सोडिला. भर तारुण्यात (१८ व्या वर्षी) प्राप्त झालेल्या या वैधव्य प्रसगी राणी साहेबास इतकें दुःख झाले की, '**जगज्जननी माझा अगोदर गळा काप**' असा दुःखोद्गार एकदम त्याच्या कठातून बाहेर आला! दत्तक मजूर करण्याविषयीं राणी साहेबानींही फार खटपट केली. परतु गगाधररावाच्या मृत्युनतर अवघ्या ४।५ महिन्यातच एलिस साहेबानी **झांशी खालसा** झाल्याचें झाशीच्या दरबारात जाहीर केलें! त्या दिवशीं राणीसाहेब आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें चिकाच्या पडद्यात बसल्या होत्या. झाशीचें घराणें इग्रजाशीं अत्यत राजनिष्ठतेनें वागलें होतें. ह्मणून त्याचा इग्रज सरकारच्या स्नेहसबधावर व न्यायप्रियतेवर विश्वास होता. झाशी खालसा झाली! हे शब्द ऐकताच राणीसाहेबाना अनिवार दुःख झालें. त्या दुःखांत "**मेरी झांशी नहिं दूंगी**!" एवढीच त्या जाळींतील वाघिणीची गर्जना बाहेर ऐकू आली!

## दत्तक मंजुरीचा प्रयत्नः—

झाशीवर इग्रज सरकारचा कडेकोट बदोबस्त झाला. २४५७३८ रु. किमतीचा खजिना ताब्यात घेतला गेला. पलटणी मोडल्या गेल्या दारुगोळा व तोफा याचा नाश केला गेला आणि राणी साहेबास ५००० रु दरमहा पेनशन ठरलें. पण

त्या मानिनीनें तें स्वीकारिलें नाहीं. राजवाड्यात इंग्रज सरकारची फौज ठेविली गेली. दत्तकाच्या मंजुरी करितां यापुढेंही राणी साहेबानी फार प्रयत्न केला. **उमेशचंद्र बानर्जी** व एक युरोपियन गृहस्थ यास ६० हजार रुपये देऊन इंग्लंडात कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे पाठविलें. पण ते जे गेले ते गेले! पुन्हा त्याचा पत्ता लागला नाहीं. नानासाहेब पेशव्याचे वकील **अझीमुल्लाखान** यासही पाठविलें, परंतु ते सेबास्तपूल येथें रशियन फौजेंत मजा मारीत बसले !

## नंतरची दिनचर्या:—

या नंतरची राणी लक्ष्मीबाईची दिनचर्या म्हणजे सकाळीं ४ वाजतां उठून ८ वाजेपर्यंत स्नान व पूजा, ८ ते ११ चौकात ५ घोडे फिरविणें, ११ वाजता पुन्हा स्नान व जेवण, पुढें ३ वाजेपर्यंत अष्टगंधाने रामनाम लिहून माशास टाकणें. सायंकाळीं ८ वाजेपर्यंत पुराणश्रवण, भेटी वगैरे. नंतर पुन्हा स्नान, पुजा व भोजन. असा राणीसाहेबांचा नित्यक्रम असे. **महालक्ष्मी हें त्यांचें कुलदैवत** असल्यामुळें त्या दर शुक्रवारीं निरशन करून महालक्ष्मीच्या देवळात दर्शनास जात.

## बंडाची धामधूम:—

राणी लक्ष्मीबाई साहेब यांच्या संक्षिप्त चरित्राचा पूर्वार्ध येथें संपला आणि त्यांच्या ज्या चारित्र्यानें त्या अजरामर झा[ल्य]

त्या चारित्र्याचा आरंभ १८५७ सालच्या स्वातन्त्र्य–युद्धापासून झाला. डमडम, बऱ्हामपूर, मिरत, दिल्ली वगैरे ठिकाणीं शिपायांच्या बंडाची आग पसरता पसरता तिची ज्वाला झाशीस येऊन पोंचली ! तेथल्या इंग्रज फौजानीं आपल्या अधिकाऱ्यास गोळ्या घातल्या. व बंडाचें निशाण उभारिलें ! या वेळीं लक्ष्मीबाईंनीं कितीक गोऱ्या लोकांना व त्यांच्या बायका मुलांना आश्रय देऊन त्यांचें रक्षण केलें. त्यास अन्नदान व प्राणदान दिलें. ती वेळ मोठ्या धादलीची व आणीबाणीची होती. बंडवाल्यांनी राणीच्या वाड्यास वेढा घातला. राणीनें सागरच्या कमिशनरकडे 'झाशीची काय व्यवस्था करावयाची' ह्मणून विचारणा केली. उत्तर येईपर्यंत झाशीच्या काहीं गोरे लोकांनी झाशीची व्यवस्था राणीकडे दिली. परंतु त्यांच्या पदरीं इंग्रजी जाणणारा कोणीच हुषार कारभारी नसल्यामुळें पत्रव्यवहारांत भारीच गोंधळ झाला. इकडे बंडाची संधी साधून राणी साहेबांचे आप्तसंबंधी **सदाशिव नारायण पारोळकर** हे झाशी घेण्यास आले व त्यांनी झाशीच्या प्रांतांत धुमाकूळ घातला. तसाच वोरछाच्या राणीचा **नथेखां** नांवाचा कोणी सरदार फौजफाटा घेऊन झाशीवर आला. तेव्हां मात्र लक्ष्मीबाईंनीं ५००० फौज जमवून व दारुगोळा भरून युद्धाची तयारी केली, व त्या दोघांसही पिटाळून लाविलें. या युद्धांतील राणी साहेबांचें शौर्य अत्यंत प्रशंसनीय होतें. युद्ध ऐनरंगांत आलें असतां त्या तोफखान्यावर स्वतः उभ्या हून गोलंदाजास उत्साहित करतांना ह्मणत होत्या कीं,

**" मर्द हो ! बरोबर गोळे मारा, आज जर तुह्मी नथेखाला फिरविला तर शेर शेर सोन्याचें कडें तुमच्या हातांत घालीन ! "**

सदाशिवराव पारोळकर व नथेखा या पराभूत झालेल्या शत्रूद्वयानीं इंग्रज अधिकाऱ्याची अशी समजूत करून दिली की, आह्मी इंग्रज सरकारकरिता स्वतंत्र झालेल्या राणीबरोबर लढलों ! जून जुलै मध्यें या गोष्टी होत आहेत तोंच सप्टेंबर–मध्यें इंग्रज सेनापती **सर ह्यूरोज ह्याची छावणी झांशीस आली.** राणी साहेबानी त्याजकडे अगोदर वकील पाठविला, पण त्या वकिलासच फाशी देण्यात आले ! व झाशीच्या किल्यावर कुलपी गोळ्याचा भडिमार सुरू झाला.

**रण–धुमाळीः—**

राणी साहेबाची राजनिष्ठा येथें दुर्दैवानें सपली व त्या युद्धास सिद्ध झाल्या. त्यांनीं **घनगर्ज, कड्कबिजली भवानीशंकर,** व **नालदार** अशा चार नामांकित तोफांचा किल्ल्यावरून गडगडाट आरंभिला. दारू तयार करण्याचें कोठार घातलें. परंतु कोणा फितुऱ्यानें किल्ल्यावरील माऱ्याची व दारूची जागा इंग्रजास अचूक दाखविली. त्यामुळें इंग्रजी तोफाचे गोळे दारूच्या कोठारावर पडून मोठा **भडका उडाला** गणेश महाल आरसे महाल, याच्या ठिकऱ्या उडत असता आणि शहरांतील सराफ बाजार, मोतीचौक यातून **आगीचे**

डोंब उठत असता ही धैर्यशालिनी किल्ल्याच्या तटावर सारखी देखरेख करीत होती. हें युद्ध १२ दिवस चाललें होतें. राणी साहेबाच्या **सापत्न मातुश्री** तोफखान्यावर देखरेख करीत होत्या. मध्यतरी **तात्या टोपे** २० हजार फौजेनिशी राणी साहेबाच्या मदतीस आले, परतु अदूरदर्शीपणानें त्याचा पराभव झाला या युद्धातील राणी लक्ष्मीबाईच्या युद्धकौश-ल्याचे व अलोट धैर्यांचे सर्व देखावे डोळ्यापुढें दिसत अस-ताही त्याचें संपूर्ण वर्णन करण्यास स्थळ नाहीं, झाशीचे तट गेले, झाशीस आग लागली, **कुंवर गोषखान व गुलाम खुदाबकस** हे नामांकित गोलंदाज मारले गेले. हें पाहून राणी साहेबानीं निवडक लोकानिशी कोटात शिरलेल्या इग्रजावर वाघिणी सारखी झेप घालून त्याची **कत्तल उडविली.** चोहोंकडून गोळ्या सुद्धा लागल्या तेव्हा त्या पुन्हा किल्ल्यात परत आल्या. इग्रजाच्या पलटणींनीं चहुकडून हुल्लड **चालविली,** राणीचे तटावरील बरकदाज मारले गेले, व गोरेलोक आत घुसले आता **निभाव लागत नाहीं,** असे पाहून त्यांनीं आपल्या आवडत्या दत्तक **पुत्रास पाठीवर बांधिलें** व उत्तर दिशेनें तटावरून घोडा घालून त्या इग्रजाची फळी **फोडून निघून गेल्या !** या प्रसगी त्यांनीं आपल्या विश्वासू व स्वामिभक्त नौकरास सांगितलें कीं, **ज्यांस माझ्या बरोबर या स्वातंत्र्य युद्धांत प्राणार्पण करणें असेल त्यांनींच मजबरोबर यावें** बाकीच्यानीं आपलें प्राण रक्षण करावे. त्याप्रमाणे कांहीं स्वामिभक्त लोक राणीसाहेबाबरोबर गेले. बाकीचे

लोक दोन्ही बाजूनें रांगा धरून उभे होते. त्यास कंठे कडे, हार बाटीत बाटीत ही झांशीची सौभाग्यलक्ष्मी जात असता ते राजनिष्ठ लोक ढळढळा रडत होते. राणीसाहेबांचे सापत्न बंधु पूज्य महाशय चिंतामणराव मोरेश्वर तांबे ( जे हल्लीं नागपुरास आहेत ) हे त्यावेळीं दोन वर्षांचे होते, त्यांच्या मातोश्रींनीं गोरे लोक आत शिरलेले पाहताच चिंतामणरावास चौघडींत गुंडाळून खंदकांत टाकिलें व आपल्या बहिणीसह पाठोपाठ उडी घेतली ! या दोन्हीअबलांनीं त्या दोन वर्षांच्या अर्भकासह १४ मैलावरील गुलसराई गावापर्यंत धावता प्रवास केला ! यावरून त्या प्रसंगाची कल्पना करिता येईल.

राणीसाहेब इंग्रजी पल्टणांतून हां हां ह्मणता निघून गेल्यानंतर लेफ्टनंट बौकर हा त्यांच्या पाठलागावर निघाला व त्यानें त्यास झांशीप्रांताच्या सरहद्दीवरील भांडेरगांवीं गांठलें. या गावीं त्या आपल्या बहिणीकडे थांबून मुलास फराळास घालीत होत्या. स्त्रिया ह्या जात्या कोमल असतात खऱ्या, परंतु त्या वेळीं या रणरागिणीची मुद्रा अगदीं बदलून गेली होती. त्यानंतर राणीसाहेबांच्या भगिनीनें आपल्या आप्तस्वकीयाजवळ बोलून दाखविलें की " मनू मजकडे आली तेव्हां तिच्या मुद्रेकडे बघवत नव्हतें शेवटची भेट ह्मणून राणी साहेबानी बहिणीस आपल्या कमरेची

एक कट्यार दिली. बौकरला पाहताच चपळाईनें मुलास पाठीवर बांधून त्यांनीं बौकरशी दोन हात केले व त्यास घायाळ करून त्या निघून गेल्या.

११२ मैलाची दौड मारून त्यानी काल्पीस नानासाहेब पेशव्याची गाठ घेतली. याच दिवशीं स्त्रियाचा रजोधर्म त्याच्या दु:खास कारण झाला. यावेळची त्याची स्थिति कशी बरें लिहावी? लिहिताना नेत्र भरून येतात. मर्दानी पोषाखात असलेल्या या शौर्यशालिनीला नानासाहेबाची भेट घेण्यापूर्वी नेसायास दुसरे वस्त्र नव्हतें झाशीच्या ऐश्वर्यशालिनीला --या भारतलक्ष्मीला-- तें वस्त्र नानासाहेबाजवळ मागण्याचा प्रसग यावा काय? नानासाहेब हे लक्ष्मीबाईस आपल्या बहिणीप्रमाणेंच मानीत, त्यास कळताच त्यानीं स्वत: होऊन राणीसाहेबाकडे उची वस्त्रे, तबू वगैरे सर्व सामान पाठवून दिलें.

काल्पी येथे तात्या टोपे, रावसाहेब, बांदेवाले नवाब याचा मेळ जमला. राणीसाहेबांचे मातुल काही कामाकरिता काल्पीस आले असता त्यानीं राणी साहेबाची गाठ घेतली. दुसऱ्या दिवशीं महालक्ष्मीचा कुळधर्म होता. "कुळधर्माकरिता उद्या राहून जावें" असे राणीसाहेबानीं सांगितले असता त्यानीं जाण्याची त्वरा दर्शविली. त्यावर "ठीक् आहे आता तुमची आमची ही शेवटची भेट

आहे" असें उद्गार काढून त्यानीं त्याचा निरोप घेतला. यावरून या स्वातंत्र्य युद्धांत लढतां लढतां देहार्पण करण्याचा या मनस्विनीचा केवढा दृढनिश्चय झाला होता याची कल्पना होते. त्याचे मामाही ह्मणत असत कीं, "या वेळी मनूच्या चेहऱ्याकडे पहावत नव्हतें, ती चवताळलेली वाघीण दिसत होती.' जातीची अबला, अवघें ३२ वर्षांचें वय, तारुण्याचा भर अशा स्थितीमध्यें सर्व ऐश्वर्यांचा नाश व घोर संकट यांनीं लवमात्र विचलित न होता मुलास पाठीवर बांधून काल्पीच्या घनघोर संग्रामांत सरह्यूरोजच्या नामांकित तोफखान्यापुढें आपल्या २००।२५० लालवर्दीच्या लोकांनिशीं २० फुट अंतरापर्यंत धावून जाणारी ही सौदामिनी सरह्यूरोजच्याही स्तुतीला पात्र झाली. काल्पीचें युद्ध फारच निकराचें झालें. ज्यावेळीं राणीसाहेब आपला उमदा घोडा फेकीत समशेरीचा हात चलाखीनें चालवीत इंग्रज तोफखान्यावर चढाई करून गेल्या त्यावेळी त्यांची ती वीरश्री, तो आवेश, ती मर्दुमकी पाहून पेशव्याच्या सेनापतीसही स्फुरण चढलें व ते इंग्रजांवर तुटून पडले! तेव्हा एकच रणधुमाळी मातली. राणीच्या माऱ्यानें इंग्रजी सैन्य मागें हटलें व तिच्या धाडसी आवेशाचा भयंकर देखावा पाहून इंग्रज गोलंदाज स्तब्ध झाले! याप्रमाणे ह्यूरोजच्या तोंडावर पराजयाचा कालिमा पसरत असतां तो ऐनवेळी आपला उंटावरचा तोफखाना घेऊन राणीसाहेबाकडे धावत आला. व त्यानें आपली बाजू राखिली तेव्हांपासूनच उंटांचें महत्व त्यास कळून आलें.

याही युद्धात केवळ अव्यवस्थितपणानें बडवाल्याच्या पराभव झाला तेव्हा मार्ग काढण्याकरिता हुलकावण्या देणाऱ्या **राणीला इंग्रजी वीरांनीं पकें घेरलें.** नतर रावसाहेब वगैरे हताश होऊन पलायनाच्या विचारात होते. पण त्या कल्पक व धैर्यवत **सांग्रामिकेनें** ग्वाल्हेरचा किल्ला सर करण्याची अजब युक्ति काढिली. व ती शेवटास नेली. ग्वालेरच्या युद्धात **जयाजीराव शिंदे** आपल्या तोफखान्यासह **बालेघाटी** फौज घेऊन आले होते. त्याच्या तोफाचे गोळे जेव्हा बडवाल्याच्या फौजेंत धडाधड येऊन पडू लागले तेव्हां एकच गोंधळ उडाला. त्यावेळीं देखील **राणीसाहेबांनीं** सर्वांच्या आधी शिंद्याच्या **तोफखान्यावर बेधडक चाल केली.**[१] प्रत्येक वेळीं तोफखान्यावर धाऊन जाणें ह्मणजे प्रत्यक्ष काळाच्या मुखात उडी घेणें होय. असलें जें धैर्य धर्यवतातही आढळावयाचें नाही तें या प्रबल धैर्यवतीस कोठून लाभलें होतें नकळे. तिने तोफावरील **गोलंदाज कापून काढिलें** व शिंद्याच्या बालेघाटी फौजेचा धुव्वा उडवून जयाजीरावास भर युद्धातून पळावयास लाविले!

---

१ या वेळीं ग्वालेरीस दिनकरराव ह्मणून प्रभु जातीचे मुख्य दिवाण होते. आमच्या एका प्रभुमित्रांच्या आजीबाईनीं सागितलेली एका चित्राची हकिकत आह्मास अशी कळली कीं, घोड्यावर स्वार झालेल्या लक्ष्मीबाईच्या घोड्याचा एक पाय तोफेच्या तोंडांत व वरून राणी साहेब गोलंदाजाचें डोकें मारींत आहेत असें काढलेलें त्यावेळचें चित्र उपलब्ध होतें आता तें सांपडत नाही

ग्वाल्हेरचा विजय महत्त्वाचा होता. दारुगोळा, फौजफाटा, सर्व काहीं मिळाले होतें. पण रावसाहेब पेशव्यास तेथें **राज्याभिषेक** करवून घेण्याची बुद्धि झाली! युद्धाची तयारी, दक्षता सर्व काहीं एकीकडे राहून ग्वाल्हेरीस **ब्राह्मणभोजनें** सुरू झाली राणीसाहेबानी पेशव्यास पुष्कळ उपदेश केला पण तो सर्व व्यर्थ गेला. शेवटीं **सर ह्यू रोजची** स्वारी तेथें येऊन पोंचलीच. ह्यू रोजनें पहिल्याच धडाक्यानें पेशव्याची **मुरारची छावणी** सर केली तेव्हा कुठें **पेशवे** व **तात्याटोपे** याची धावपळ सुरू झाली! तात्या टोप्यानीं करुण वाणीनें राणी साहेबाची प्रार्थना केली. तेव्हा त्या सद्गदित होऊन ह्मणाल्या " **भिऊ नका, मी माझें कर्तव्य करितें, तुह्मी तुमचें कर्तव्य करा** " त्याच्या सूचनेप्रमाणें सर्व फौजा एकदम मुकाबल्यास निघाल्या. जिकडे इंग्रजाच्या नामांकित फौजा व तोफखाना होता ती बाजू साभाळण्याचे काम राणी साहेबाकडे आलें! त्यानी आपल्या सैन्याची योग्य मांडणी करून घनघोर युद्ध आरंभिलें. पहिल्या दिवशीं तर इंग्रजी सेनापतीचे जोराचे हल्ले, हुलकावण्या चढाई वगैरे कशालाच त्या **यशवंतीनें** दाद दिली नाहीं. लेफ्टनंट, क्याप्टन वगैरे इंग्रज लढवय्यानी झपाट्यानें घोडदळाचे हल्ले चढवावे आणि बंदुकी ठासलेल्या व संगिनी चढविलेल्या पायदळी तुकड्याच्या करामतीला अवसर मिळवून देण्याचा प्रयत्न करावा. परंतु प्रत्येक वेळीं त्याचा हा कावा ओळखून राणी साहेबानी आपल्या मोर्चाचा वद तुटू न देता पुढे सरून ' **घेमार**

करावी ! असा प्रकार सर्व दिवसभर चालला. शेवटीं त्या दिवशीं इंग्रज सेनानी हताश होऊन छावणीत निघून गेले.

दुसऱ्या दिवशी अवसानघातकी पेशव्यांनीं आपले मोर्चे घालविले, व ती आवई चोहोंकडे पसरताच राणीचे लोक मोर्चे टाकून पळू लागले तेव्हा त्यास आपली 'इतिश्री' करून चुकली. उरलेल्या लोकानिशीं त्या झुजत होत्या, फळी फोड–ण्याचा यत्न करीत होत्या व इंग्रज झुजार तो यत्न सिद्धीस जाऊ देत नव्हते. शेवटीं बिजली कडाडली व राणी लक्ष्मीबाई फळी फोडून निघाल्या ! तोंच दुजर्स स्वार चित्त्यासारखे त्यांच्या मागून धावले. थोड्याच अंतरावर झटापट झाली, काहीं मुडदे खालीं पडले व ती वायुकन्या पुन्हा दृष्टिआड झाली ! तों "बाईसाहेब मेल्यें, मेल्ये !" ह्मणून मुंदर दासी ओरडली. मुंदरच्या पाठींत गोळी घुसून ती ठार झाली. ते करुण दृश्य पाहताच पुन्हां लक्ष्मीबाईनीं आपला घोडा वळविला व त्या स्वारास ठार केलें आणि घोडा फेकला तों पुढें एक लहानसा नाला[१] आला तेथें तो शिंदेशाही घोडा अडून उभा राहिला ! काही केल्या पाय उचलीच ना !

---

१ श्रीमंत सरदार खासेसाहेब महाराज पवार होममेंबर ग्वालियर गव्हर्मेंट यांच्या प्रेमळ निमंत्रणावरून मी दोन वर्षांपूर्वी ग्वाल्हेरीस गेलों असता हा नाला पाहण्यात आला श्रीमंत व मी मोटारींतून श्री माधवजयंतीच्या उत्सवास जात असता मोटार या नाल्याजवळ आली तेव्हा श्रीमंत सरदार साहेब ह्मणाले "तुमच्या संग्रामदेवतेचा घोडा जेथें अडला तो हा नाला ! येथें जवळच गंगादासबुवांचा मठ होता ह्मणतात" राणीसाहेबांच्या त्या पवित्र स्थळाला मी नमन केलें

अखेरः—

त्याचा नेहमीचा आवडता घोडा दोन दिवसापूर्वी युद्धात मेला होता. राणीसाहेब चटकन खालीं उतरल्या व लगाम धरून त्याला पुढें नेऊ लागल्या. परतु तो पर्वतासारखा निश्चल उभा ! इतक्यात हुजर्स स्वारांची दुसरी टोळी येऊन पोचली, तेव्हा त्या चटकन घोड्यावर चढून युद्धास सिद्ध झाल्या तरवारीवर तरवार आदळून निकराची झटापट सुरू झाली. एका अबलेवर अनेकाचे घाव पडले. राणी साहेबाची कवची विदीर्ण होऊन त्याचा एक नेत्र बाहेर आला. तोच दुसऱ्या एकानें किराचीची हूण त्याच्या छातींत मारिली. मारता मारता एक स्वार राहिला होता त्यालाही साफ करून ही झांशीची संग्रामदेवता ग्वाल्हेरच्या रणशय्येवर निजली ! राणीसाहेबाबरोबर ‘ देशमूख ’ या नावाचे विश्वासू नोकर होते. त्याच्या घोड्यावर लक्ष्मीबाईंचे प्रियपुत्र दामोदरराव होते. देशमुखानीं जवळच्या गंगादास बुवाच्या मठातून तातडीनें गंगाजल आणून त्याच्या तोंडांत घातलें त्या भारतलक्ष्मीनें एकवार पुत्राकडे पाहिलें. आणि परलोकी प्रयाण केलें ! अगोदरच सागून टेविल्या-प्रमाणे देशमुखानी जवळच्याच गवताच्या गंजींत त्या पवित्र देहास ठेवून अग्नि लावून दिला !



श्रीमंत दामोदरराव गंगाधरराव झांशीवाले

राणी लक्ष्मीबाईंचे पुत्र



—श्रीमंत चिंतामणराव मोरेश्वर तांबे.—

(राणी लक्ष्मीबाईचे सापत्न बंधु.)

# " झांशीची राणी "

नव्या काव्ययुगाचे नवे शिपाई ह्मणून कै केशवसुतांनीं आधुनिक कवितेचा जरिपटका हातीं धरण्याचा मान पटकाविला, त्याप्रमाणें हिंदुस्थानात चालू असलेल्या स्वातंत्र्यसंपादनाच्या चळवळीनें प्रेमाच्या तंद्रींतून जागा झालेला पहिला महाराष्ट्रशाहीर **विनायक** ( कै विनायक जनार्दन करंदीकर ) हा होय महाराष्ट्राच्या चालू इतिहासात **आगरकर, टिळकांचा** जो संबंध, तेंच नातें आधुनिक कवितेच्या इतिहासात **केशवसुत–विनायक** यांचें आहे सामाजिक चळवळीची छाप एकाच्या मनावर पडली तर राजकीय चळवळीनें दुसरा खडबडून उठला सामाजिक सुधारणेची मुहूर्तमेढ एकानें रोविली तर दुसऱ्यानें राजकीय चळवळीचें शिंग फुकलें. एकानें समाजाचे शिव्याशाप सहन केले तर दुसऱ्यानें परकीय सत्तेचे जळजळीत निखारे हातात घेतले ह्मातान्या आजीबाईप्रमाणें दुर्बल बनलेल्या हिंदुसमाजानें **आगरकरांच्या** नावानें बोटें मोडलीं, तर रावणासारख्या चौदा चौकड्यांचें साम्राज्य हाकणाऱ्या बलिष्ट नोकरशाहीनें **टिळकांच्या** कपाळीं वनवास लिहिला आगरकर व टिळक हे दोघेही थोर राष्ट्रपुरुष होत ह्यांच्या जीवनानें आधुनिक महाराष्ट्राच्या जीवनाला निराळें वळण लागलें या दोघांच्या कर्तबगारीनें राष्ट्रात क्रांती झाली आणि ह्मणूनच अशा कर्तबगार पुरुषांना सृष्टीचे ईश्वर ह्मणावयास हरकत नाहीं कारण आपल्या अंगीं असलेल्या अद्भुत चैतन्यानें [illegible] तें नवीन सृष्टि उत्पन्न करितात.

३८७०

केशवसुत व विनायक हे केवळ शद्बसृष्टीचे ईश्वर होते यांच्या कर्तबगारीनें राष्ट्राला निराळें वळण लागलें नाहीं यानीं महाराष्ट्र घडविला नाहीं यांच्या वाणींत तसें अद्भुत तेज असतें तर त्याना लोकानीं मोठ्या अभिमानानें व्यास-वाल्मिकींच्या पक्तींत बसविलें असतें, आणि आगरकर टिळकांच्या ऐवजीं याच्याच नांवाचा यशोदुंदुभी चहूकडे दुमदुमत राहता, परतु प्रत्यक्ष सृष्टींत नियंत्रणात्मक कार्य करण्याचे सामर्थ्य अंगीं नसले तरी त्यांत कमीपणा वाटण्याचे कारण नाहीं कारण तसे सामर्थ्य असणारा महापुरुष 'हजारांतून एखादा' च असतो; त्यामुळें या दोघां कवींनी आगरकर-टिळकांच्या कार्यानें राष्ट्रांत जें नवें चैतन्य उसळलें त्याचें प्रतिबिंब आपापल्या शक्तीप्रमाणें आपल्या मर्यादित स्वरूपाच्या शद्बसृष्टींत उतरविलें राष्ट्रातील उसळलेल्या नवीन विचारलहरींचा फोनोग्राफ त्यांच्या काव्यातून वाचावयास मिळाला, आणि आगरकर-टिळकांच्या तेजस्वी जिवनक्रमाचा परिणाम इतिहासरूपानें अन्य स्वरुपात दिसला असला, तरी केशवसुत-विनायकापासून आजकालच्या कवीपर्यंत जीं जीं गीतें प्रचारात आलीं आहेत तीं वाचून देखील एखाद्याला समजावून घेता येतील ! कारण गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रात 'द्रष्टा' या पदवीला शोभेल असा एकही कवि निर्माण झाला नाही सर्वच कमी अधिक प्रमाणांत शद्बसृष्टीचे मालक ! आपापल्या आवडीनिवडीप्रमाणें राष्ट्रात उत्पन्न झालेले क्रातिमय विचार आत्मसात् करून ते शद्बांतून उतरविण्याचें कार्य या कवींनीं केलें आहे केशवसुत-विनायकापूर्वी हें देखील कार्य कोणी केलें नाहीं. त्यापूर्वी जुन्या संस्कृत किंवा मराठी कवितेंतील जुनेच विचार निराळ्या वृत्तात मांडतां आले म्हणजे तो कवि समजला जाई कवीच्या काळात चाललेली सामाजिक व राजकीय उत्क्रांति त्याच्या स्वप्नीहि नसे. तो आपल जुन मराठी व संस्कृत

काव्यग्रंथ वाचावयाचा--पाठ करावयाचा झटलें तरी शोभेल व त्यातील विचार व्याकरणशुद्ध शब्दांत व वृत्तांत बसवून मोकळा व्हावयाचा, त्यामुळें आधुनिक कवितेला वाहिलेल्या **काव्यरत्नावलीला** देखील

> " तीं तीं पदें नित्य फिरोनि येती
> त्या त्याच अर्थाप्रति दाविताती
> सौंदर्य सारें रचनेंत आहे
> सत्काव्य तेणें नव वाटताहे "

हेंच ध्येय ठेवावें लागलें. द्रष्टा या संज्ञेला पात्र असलेला कवि प्रत्यक्षांतून भविष्यांत उड्डाण मारितो आणि त्याच्या वाणीनें जागृत झालेला समाज कवीचें ध्येय गाठण्याचा प्रयत्न करितो केशवसुत विनायक थोर असले तरी द्रष्टे नव्हते त्यांची वाणी समाजाच्या कानावर आदळली नाहीं, व नवीन ध्येयेंही त्यांनी मांडलीं नाहींत त्यांनी आगरकर--टिळकांची ध्येयात्मक सृष्टि व तडफदार कामगिरी शब्दांत गुंफण्याचा प्रथमच प्रयत्न केला

**केशवसुत विनायकांनी** हा पायंडा प्रथम घातला आणि राष्ट्रांत चाललेल्या खळबळीकडे बघण्याचा उपक्रम सुरू केला, या कारणास्तव त्यांची योग्यता मोठी ते द्रष्टे नसले तरी सभोंवतालची क्रांति त्यांना दिसे व राष्ट्रांत उसळलेले नवीन विचार त्यांना ऐकूं येत

**केशवसुतांच्या** सच्च्या चेल्यांत कविश्रेष्ठ **गोविंदाग्रज** व **गिरीश** यांची गणना करितां येईल तर **विनायकांच्या** परंपरेंत **टेकाडे** व **तिवारी** हे जाऊन बसतील. **टेकाडे** यांचे विचार प्रचलित काळाशीं इतके संलग्न झालेले असतात कीं, चालू

वर्तमानपत्रातील सुंदर खुमारीदार लेखांची व प्रतिभासंपन्न व्याख्यानांची पडछाया त्याच्या अनेक गीतात पडलेली आढळते परंतु खानदेशच्या **तिवारींनीं** आपल्या खानदेशीय गुरु विनायकाचा खानदानी बाणा एखाद्या सच्छिष्याप्रमाणें उचलला आहे. हल्लीच्या महाराष्ट्रातील स्वातंत्र्योन्मुख चळवळीला पोषक होतील असे गत इतिहासातील मनोरम प्रसंग निवडून ते **मनोहरलीलेनें** रगविण्याचा **विनायकाचा** बाणा **तिवारींनीं** करतलामलकवत् केला आहे तिवारींनी रचलेलीं "**मराठ्यांचीं संग्रामगीतें**" या विधानाचा पाठपुरावा करतील. मराठ्यांचीं संग्रामगीतें देखील आवृत्तीचे पाच बांध फोडून सहाव्याची वाट चालू लागण्या- इतकीं लोकप्रिय झालीं आहेत विनायकाप्रमाणेंच मराठ्यांच्या देवि **दुर्गेचा प्रसाद**, मराठ्यांचीं उज्वल **संग्रामगीतें** व त्यांचे तेजस्वी **पराक्रम** यथाशक्ति गाऊन, घरोघरी पोहोंचविण्याचा विडा **तिवारींनीं** उचलला आहे **नामदेवाची** शतकोटी अभंगांची प्रतिज्ञा **तुकारामानें** शेवटास नेली. त्याप्रमाणें **विनायकाच्या** अकाली मृत्यूनें महाराष्ट्राच्या काव्यमय इतिहासाचे तुटलेले धागे सांधण्याचें पवित्र कार्य **तिवारींनीं** आपल्या शिरावर घेतलें आहे

विनायकाच्या कवितेचें श्री **माडखोलकर** यांनीं अत्यंत सुंदर व मार्मिक परीक्षण केलें आहे. विनायकाच्या ऐतिहासिक कवितांचें परीक्षण करितांना पद्मिनीची भरपूर स्तुति केल्यावर ते म्हणतात--- "**पद्मिनी, दुर्गावती व संयोगिता** हीं गाणीं बरीं साधलीं आहेत. विनायकाच्या इतर कवनांच्या मानानें हीं गाणीं साधारणच आहेत या गाण्यांतील '**कृष्णा कुमारी**' हें गाणें उत्तम आहेत परंतु या रमणीरत्नमालेंतून रावसाहेब पेशव्यां-

च्या प्रतिनिधि पति रमाबाई व झांशीची पराक्रमी राणी दिगन्तकीर्ति लक्ष्मीबाई हीं दोन महाराष्ट्रीय युवतीरत्नें कशीं गळलीं देव जाणें, ' श्री माडखोलकरांनी दाखविलेली विनायकाची एक अपुरी समस्या श्री. तिवारींनी हल्लीं पूर्ण केली आहे. या समस्यापूर्तीचें दृश्य फल म्हणजे आज पुन्हा प्रसिद्ध होत असलेली ' झांशीची संग्रामदेवता ' हे होय ! ' मैं आपनी झांसी नहि देऊंगी ' असें स्वाभिमानपूर्वक स्वरात मेजर एलिसला बजाऊन, संधि येताच स्वातंत्र्य-युद्धात सामील झालेली ही रणदेवता, स्वामिभक्तीने प्रेरित होऊन नानासाहेब पेशव्याच्या बाजूस उभी राहिली मराठ्यांच्या संग्रामगीतांत ही मर्दानी झांशीवाली राणी आपल्या घनगर्जे तोफा डागून चमकली व नदीतून घोडा फेंकून बिजलीप्रमाणें कालग्रास कल्पांत करती झाली; इंग्रजांच्या पराक्रमापुढें जी तलवार वांकली नाहीं, ती पेशव्यापुढें केवळ स्वामिभक्तीनें वांकली, व त्यांच्यापासून [illegible] ती ग्रहण करून केवळ कर्तव्याकरितां आपल्या जिवावर उदार झालेल्या या आधुनिक विद्युल्लेनें जयाजीराव शिंद्यासारखा वीर पळवून एकच रणकल्लोळ उडविला व शेवटचा समरलीला दाखवून महाराष्ट्रललनेची तेजस्विता सर्व जगाच्या प्रत्ययास आणिली तिच्या पराक्रमानें तिचे शत्रू परकीय इंग्रज देखील विस्मित झाले व त्यांनी मुक्तकंठानें तिची प्रशंसा केली. शिवछत्रपतींची भवानी तरवार राणीच्या रुपानें हिंदुस्तानात पुन्हा एकदां चमकली व आपली पराक्रमी धार दाखवून गेली राणीच्या पराक्रमाचें जें विद्युल्लतेप्रमाणें असह्य परंतु क्षणभरच टिकणारें तेज पसरलें, त्या दिव्य तेजाला आपल्या दृढ प्रबंधांत साठविण्याचा तिवारींनीं यत्न केला आहे या

दहा प्रकरणांत चमकून गेली तीच **झांशीची राणी** ! तीच रण-शूर **लक्ष्मी** ! या आठ घटकेच्या परंतु अवर्णनीय तेजांतच झांशीच्या राणीचें चरित्र भरलें आहे, आईबापाच्या पोटीं जन्मास येणें, राजाशीं किंवा राजपुत्राशीं लग्न करणें व राजाबरोबर राणी म्हणून मिरविणें या बाळबोधी चरित्राच्या अनेक राण्या आजवर झाल्या, आजलाही अनेक जणी संस्थानातून आपल्या वैभवाचें तोऱ्यानें प्रदर्शन करीत आहेत व पुढेंही श्रीमंतीचा डिमाख दाख-विणाऱ्या अनेक निर्माण होतील; पण स्वाभिमानानें नटून, स्वदे-शाभिमानाच्या तोऱ्यात परकीय बलिष्ठ सरकाराशीं पराक्रमानें झुंज घेणारी, रणांतून न हटणारी मृत्युला खेळणें समजणारी व कीर्तीपुढें जीवित तुच्छ मानणारी पराक्रमाची स्वातंत्र्याची व तेजाची मूर्ती एकच ! आणि ती म्हणजे **झांशीची राणी लक्ष्मीबाई** ! तिचे **पोवाडे** नामर्दांना मर्द करतील व मृतांच्या अंगीं चैतन्य आणितील ! एवढ्याकरिताच तिच्या लक्ष्मीपणाच्या अल्प परंतु दिव्य काळाचें मनोरम शब्दचित्र **तिवारींनीं प्रेमानें** गुंफून महाराष्ट्र-रसिकापुढें मांडिलें आहे

सुदैवानें तिवारींना काळ अनुकूळ आल्यामुळे, त्यांना राणीचे यशोगीत शक्य तेवढ्या मुक्तकंठानें गाता आलें, व आपलें मातृऋण फेडता आलें कै इतिहासाचार्य राजवाडे यांनी मागें एका लेखांत महाराष्ट्रांतील कर्त्या पुरुषांची जंत्री आखली असता, नानासाहेब पेशवे, तात्या टोपी व राणी लक्ष्मीबाई ही त्यांच्या लेखातील तीन पराक्रमी व प्रमुख नावें प्रकाशकांना परिस्थि-तीच्या प्रभावानें गाळावीं लागलीं. परंतु काळाच्या ओघाबरोबर राणीच्या जीवन-चरित्राचें पावित्र्य व तेज मित्रांप्रमाणें शत्रूंना देखील नमवू लागलें आहे तेव्हां तिवारींसारख्या तडफदार व

इतिहासाभिमानी कवीनें राणीच्या चरणांवर आपली गोड कुसुमांजलि अर्पण करावी, हें स्वाभाविकच होय.

हे सुंदर प्रबंध वाचून अशा तेजस्वी राणीच्या पराक्रमाचें चीज झालें नाहीं हा दुःखद विचार मनात येऊन नेत्रातून पाणी वाहणार नाहीं असा वाचक सापडणार नाहीं राणीचें चरित्र अत्यंत तेजस्वी खरें पण आज भोंवताली पसरलेल्या दुर्बलतेच्या विरोधानें वाचकाचें मन हुळहुळें करून त्यास क्षणभर रडावयास लावतें, आणि हीच तिवारींची प्रतिमा होय जुना इतिहास वीर्यशाली असला तरी आजच्या दुर्बलतेनें जुने पोवाडे वाचून उत्साहाबरोबर अनुतापही उत्पन्न होतो आणि या मिश्र भावनेला पोषक अशाच वृत्तयोजना करण्यात तिवारींनीं विलक्षण मार्मिकता दाखविली आहे. आज महाराष्ट्ररसिकांपुढे पुनश्च स्वतंत्रतेनें येणाऱ्या या झांशीच्या स्वातंत्र्य लक्ष्मीची दशपदी महाराष्ट्रवाचकाकडून आदरानें पूजिली जाईल असा मला पूर्ण भरवसा आहे विनायकाची अपुरी समस्या तिवारींनीं पूर्ण केली, परंतु प्रत्यक्ष राणीची अपुरी समस्या पुरी करू पाहणारा, क्वचित्काळीं उदयास येणारा एखादा हरीचा लाल या दशपदीच्या पुढे जाऊ शकेल

जबलपूर
ता. ५-७-२७ } नारायण केशव बेहेरे.

# निवेदन.

झांशीच्या संग्रामदेवतेची ही तिसरी आवृत्ति प्रसिद्ध करितांना फार संतोष वाटत आहे. पहिली आवृत्ति ता० १।३।२५ ला प्रसिद्ध झाली व दुसरी ता० २५।२।२७ ला प्रसिद्ध झाली. आणि त्या नंतर दोन वर्षांनी ही तिसरी आवृत्ति प्रसिद्ध करण्याचा सुयोग आला आहे.

झांशीच्या संग्रामदेवतेची संग्रामगीतें हरदास, कीर्तनकार गोरक्षणाचे प्रचारक यांनी बृहन्महाराष्ट्रांतील कोनाकोपऱ्या पर्यंत नेऊन भिडविली आहेत. शाळा, मेळे, संमेलनें, उत्सव, गणेश चतुर्थी यांतून या संग्रामदेवतेच्या रणकीर्तीचा जयजयकार ऐकूं येत आहे. नवाकाळ, महाराष्ट्र, केसरी, प्रबोध, आनंद विविधज्ञानविस्तार प्रागतिक, मराठीशिक्षक वगैरे मराठी वृत्तपत्रें व मासिकें यांच्या विद्वान व रसिक संपादकांनी या झांशीच्या संग्रामदेवतेवर दिलेले प्रसन्न अभिप्राय या आवृत्तींत छापले आहेत, त्यावरून त्यांची या पुस्तकाविषयींची सदभिरुची दिसून येईल या सर्व रसिक विद्वानांचे मी मनःपूर्वक आभार मानितों

या आवृत्तीत पूर्वीपेक्षा ८ चित्रें अधिक घातलीं असून राणी साहेबांचे बंधु श्रीमंत चिंतामणराव मोरेश्वर तांबे यांचे एक व लक्ष्मी-बाईचे पुत्र श्रीमंत दामोदरराव गंगाधरराव झांशीवाले यांचे एक अशी दोन छायाचित्रें घातली आहेत. शिवाय या पुस्तकांत राणी साहेबांचें सांक्षस चरित्रही जोडिलें आहे

वरील दोघा महापुरुषांतून श्रीमंत चिंतामणराव हे आज नागपुरास पेन्शनर तहशीलदार म्हणून हयात आहेत झांशीच्या संग्रामदेवतेचे प्रस्तावनाकार कविमित्र नारायणराव बेहेरे यांजकडे

मी गेलों असता श्रीमंतांची भेट झाली त्यांनी राणीसाहेबांच्या ज्या काहीं गोष्टी सांगितल्या त्या अश्रुतपूर्व होत्या. त्यांतील कांहींचा संक्षिप्त चरित्रात उल्लेख केला आहे

राणीसाहेब ज्याना पाठीवर घेऊन लढल्या त्या दामोदर रावांच्या छायाचित्राकडे पाहून जें काय वाटतें तें लिहिता येत नाहीं. राणीसाहेबांच्या पाश्चात् त्यांना दोन वर्षे गर्द झाडीच्या प्रदेशांत अज्ञातवासानें रहावें लागलें ती हकिकत फार करुण आहे

पहिला फोटो श्रीमंत चिंतामणरावाचे जेष्ठ चिरंजीव श्री. गोविंदराव चिंतामण तांबे बी. ए. एल्. एल्. बी. यांच्या कृपेनें मिळाला व दुसरा फोटो राणीसाहेबांचे नातू श्रीमंत लक्ष्मणराव दामोदरराव झांशीवाले यांनी इंदूराहून पाठविला राणी लक्ष्मीबाईचें त्यावेळचें एक अस्सल तिरंगी चित्रही त्यांनी पाठविलें होतें त्याचा तिरंगी ब्लॉक करण्याकरितां मी तें लखनौस पाठविलें असतां दोन महिने झाले तें तिकडेही मिळालें नाहीं व इकडेही परत आलें नाहीं पोस्टाचा तपास चालू आहे !

वरील चित्राचा असा घोटाळा झाला नसतां तर महाराष्ट्रीय रसिक जनास त्या चित्र दर्शनाचा लाभ घडला असता. ही जी हानी झाली तिजविषयीं फार खेद वाटतो.

श्रीमंत लक्ष्मणराव झांशीवाले, श्री गोविंदराव तांबे या उभयतांनीं केलेल्या चित्र साह्यानें मी त्यांचा अत्यंत आभारी झालों आहे प्रो. नारायणराव बेहेरे यांच्या मार्मिक प्रस्तावनेनेंही त्यांचा मी आभारी आहे.

श्री. र. द. गोडबोले–आर्टिस्ट–पुणें यांनी मनासारखीं चित्रें काढून दिलीं व श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. एन्. एम्. नेमाडे यांनी आत्मीयतेनें छपाईचें काम सुंदर केलें याविषयीं त्यांचेही आभार मानणें उचित होय.

शेवटीं ज्या महाराष्ट्रीय रसिक जनतेनें या पुस्तकाच्या दोन्ही आवृत्यांचा समादर केला तिच्याच हातीं मी ही तिसरी आवृत्ति देत आहे मला विश्वास आहे कीं, ती पूर्वींहून अधिक प्रेमानें हिचा आदर करील.

जळगांव
ता. १८–१०–२९

दु० आ० तिवारी.

# झांशीची संग्रामदेवता.

## या पुस्तकावरील प्रमुख विद्वान व रसिक संपादकांचे अभिप्राय.

नवाकाळ-मुंबई (ता. २४।३।२७)

"महाराष्ट्रीय स्त्रीसमाजाला ललामभूत झालेल्या स्त्रीरत्नापैकीं झांशीची संग्रामदेवता लक्ष्मीबाई एक अत्यंत तेजस्वी स्त्रीरत्न आहे. ह्या पराक्रमी स्त्रीने आपल्या तेजस्वी करणीनें दिगन्त गाजविलें आहे. ज्याच्या साम्राज्याच्या आकांक्षेची काळीकुट्ट छाया आज एखाद्या प्रचंड पक्ष्याच्या पंखाप्रमाणें सर्व पृथ्वीतलावर पडलेली आहे. त्या ब्रिटिश लोकांच्या पराक्रमापुढें झांशीच्या संग्रामदेवतेची तलवार वांकली नाहीं ही गोष्ट इतिहासात अजरामर राहील. ब्रिटिश लोकांच्या फौजेला दोन ऐतिहासिक प्रसंगीं "अबला-करापुढें" हात टेकावे लागले. फ्रान्सची संग्रामदेवता जोन ऑफ आर्क हिनें ब्रिटिश सेनेला फ्रान्समध्यें पराजित केलें आणि रणबहादूर ब्रिटिश लोकांनीं रणांगणात ह्या वीरांगनेच्या पराक्रमानें आपल्या नावाला कलंक लागतो असें पाहून तिला चेटकी ठरवून जाळून टाकिलें। फ्रान्समध्यें १७८९ सालीं झालेल्या क्रांतीवर लिहितांना बर्कनें एज ऑफ शिव्हलरी नष्ट झाले असे उद्गार काढिले आहेत. परंतु फ्रान्समधील क्रांतीच्या पूर्वींच जोन ऑफ आर्कला जाळण्यात आलें. त्यावेळीं एज ऑफ शिव्हलरी नष्ट झालें होतें.

फ्रान्सच्या संग्रामदेवतेपेक्षांही कांकणभर श्रेष्ठ अशा झांशीच्या अभिजात संग्रामदेवतेनें ब्रिटिश फौजेला आपल्या तलवारीचें पाणी पाजिलें आणि त्याच्या बरोबर रण करीत करीत धारातीर्थी प्राण ठेविला. फ्रान्सच्या संग्रामदेवतेला रणांगणाबाहेर नामुष्कीने जाळण्यात आलें. झाशीच्या संग्राम-देवतेवर शेवटच्या प्रसंगी हुजर्स नावाच्या गोऱ्या लोकांच्या एका बहाद्दर पलटणीनें हल्ला केला; आणि तिला मृत्यूची वाट दाखविली. फ्रेंच लोकाना जोन ऑफ आर्कची किंमत कळली आहे. आणि त्यानी तिचें स्मारक करून ठेविलें आहे. हिंदी लोकाना झाशीच्या संग्रामदेवतेची किंमत कळलेली नाहीं काय ? ज्या देशात राष्ट्रीय भावना जागी झालेली आहे त्या देशाला आपल्या भूतकालीन उज्वलतेचें स्मरण होत नाहीं काय ? झाशीच्या संग्रामदेवतेचें स्मारक अवश्य केलें पाहिजे. आणि कवि श्री० तिवारी ह्यांनीं प्रस्तुत कविता-ग्रंथ रचून झांशीच्या संग्रामदेवतेचें 'वाङ्मयरूप' स्मारक उभारलें आहे. त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें योग्य आहे.

कवीचें कार्य जसें सौंदर्याचा शोध करणें हें आहे त्याच प्रमाणें मानवी हृदयाच्या उदात्त भावना जागृत करणें हेंही आहे. राष्ट्राच्या इतिहासांतील उज्वल प्रसंग निवडून त्यावर काव्यसृष्टीचा प्रकाश पाडून ते प्रसंग राष्ट्राच्या हृदयात जाऊन वसतील असें काव्य रचणें कवीचें कर्तव्य आहे अनेक निरुत्साही, निराशाजनक संस्कारांची

पुढें चढून राष्ट्राचें हृदय दगडासारखें निर्जीव, निश्चैतन्य झालेलें असें त्यावर कवीच्या वाणीचा ओघ फिरताच तो त्या दगडावर लाटेप्रमाणें आदळतो आणि राष्ट्रामध्यें नव-चैतन्य स्फुरूं लागतें. कवींचें हें कार्य लहानसहान नव्हे. एका दृष्टीनें कवि म्हणजे राष्ट्राचा विधाता ठरतो. महाराष्ट्रांत अशा प्रकारचें कार्य केशवसुत व विनायक यांनी करण्याचा प्रयत्न केला. त्याची परंपरा-त्यांतल्या त्यांत विनायकांची परंपरा-कवि तिवारी हे आज चालवीत आहेत. विनायकांनीं राष्ट्रीय भावनेस परिपोषक असे ऐतिहासिक प्रसंग घेऊन त्यावर कवनें रचलीं. तिवारी ह्यांनीं मराठ्यांचीं संग्रामगीतें ह्यांत मराठ्यांचा उज्वल इतिहास, महाराष्ट्रीयांपुढें मांडिला. प्रस्तुत पुस्तकांत त्यांनीं झांशीच्या संग्रामदेवतेवर लिहिलेलीं १० प्रकरणें एकत्र प्रसिद्ध केलीं आहेत. ह्या पुस्तकाची ही द्वितीयावृत्ति निघाली आहे. हें कवीला आणि रसिक वाचक-वर्गाला भूषणावह आहे. झांशी खालसा केल्याचें वृत्त दरबारांत जाहीर झाल्यावर "मेरी झांशी नहीं देऊंगी" अशी वीरवाणी लक्ष्मीबाईच्या मुखांतून बाहेर पडली. ह्या प्रसंगापासून लक्ष्मीबाईनें अखेरची समरलीला करून दाखवीपर्यंतचे सर्व प्रसंग प्रस्तुत कवितेंत पहावयास मिळतात. दुसऱ्या प्रकरणांत लक्ष्मीबाईनें १२ दिवस सर ह्यूरोज बरोबर युद्ध करून "मर्दानी झांशीवाली" ही पदवी मिळविली ह्याचें वर्णन आहे. तसेंच तिसऱ्या प्रकरणांत वरील युद्ध चालू असतां "घनगर्ज" नावाच्या तोफेनें सर ह्यूरोजला आपला अवर्णा-

भागीं घ्यावयास लाविली हा विषय आहे. ४।५।६।७ या प्रकरणात लक्ष्मीबाई शत्रूची फळी फोडून बाहेर पडते आणि काल्पीस निघून जाते. नंतर गोऱ्यांच्या पलटणींनीं तिच्या मागें झाशींत धुडगूस कसा घातला ह्याचे वर्णन आलें आहे. ८ व्या प्रकरणात इंग्रज बहाद्दराचे राजनिष्ठ तरुण मांडलिक जयाजीराव शिंदे तोफखान्याची गर्जना करीत राणीवर तुटून पडले आणि तिनें त्याच्याबरोबर घनघोर युद्ध करून त्यांना कसें पळावयास लाविलें ह्याचें रसभरित वर्णन आलें आहे. ९।१० या प्रकरणात झाशीच्या राणीनें ग्वाल्हेरास इंग्रजाचा कसा पराभव केला आणि शेवटपर्यंत कशी पराक्रमानें लढली ह्याचें कवीनें हृदयंगम चित्र काढिलें आहे. शेवटची संगरलीला दाखवून जेव्हा राणी स्वर्गाला गेली त्याचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—

तेजाची तारा तुटली शौर्याची ज्योती विझली
कीं जय–ध्वजा कोसळली स्वातंत्र्य–श्री मावळली
आशेची मंगल माला विच्छिन्न होउनी पडली

ह्याप्रमाणे प्रस्तुत पुस्तकात वीरश्रीची प्रकरणें वाचावयास मिळतात. महाराष्ट्राच्या पराक्रमाचें एक स्फूर्तिदायक चित्र डोळ्यासमोर उभें राहतें आणि सुमारें ७० वर्षांपूर्वी होऊन गेलेलीं पराक्रमाची कृत्यें पुन्हा केव्हा पहावयास मिळतील अशी वाचकाच्या मनात उत्कंठा जागी होते. श्री. तिवारी ह्यांच्या काव्यानें महाराष्ट्रीय वीररसात्मक काव्यांत निःसंशय भर पडली आहे, असें ह्मणावयास कांहींच हरकत नाहीं.

**केसरी–पुणें** ( ता. २८।४।२५ )

" महाराष्ट्रांत ऐतिहासिक काव्यलेखक ह्मणून तिवारी यानीं चांगला लौकिक संपादिला असून वरील काव्यानें त्याच्या लौकिकांत निःसंशय भरच पडेल. झांशीची संग्रामदेवता महाराणी लक्ष्मीबाई हा विषयच इतका मनोहर व तेजस्वी आहे कीं त्याच्या स्मरणानेंच महाराष्ट्र वीर्यानें भरावा. जिनें आपल्या अतुल शौर्यानें आँग्ल वीरांसही दिपवून टाकिलें त्या महाराष्ट्र रणदेवतेचें काव्य नामर्दांस अद्यापिही मर्द करील. मनांस चैतन्य आणील असें ओजस्वी कथानक तिवारी यानीं स्फूर्तिदायक रीतीनें रंगविलें असून 'फेकला तटाहुन घोडा' 'काल्पीस करी कल्पांत' 'शेवटची संगरलीला' हे प्रसंग उठावदार झाले आहेत. "

**विविध ज्ञान विस्तार–मुंबई** ( जुलै १९२६ )

" संग्रामदेवता या पुस्तकांत झांशीच्या वीर्यशालिनी लक्ष्मीबाईच्या चरित्रांतील **आतड्यास पीळ पाडणाऱ्या** आठ आणीबाणीच्या प्रसंगावरील 'उद्धवा शांतवन कर जा' या चालीवर रचलेलीं गीतें दाखल आहेत. हीं **संग्रामगीतें आवेशपूर्ण व राष्ट्रीय भावनेला पोषक** अशीं उतरलीं

आहेत. यांत संग्रामदेवतेला वेंचक वाक्सुमनांनीं मोठ्या कुशलतेनें बांधलेली पूजा पाहून कोणाच्याही अंतःकरणाला स्फुरण झाल्यावाचून राहणार नाहीं. या गीतांना 'उद्धवा शांतवन कर जा' या करुणापूर्ण चालीची जोड देणें अनुचित आहे, असें कांहीं टीकाकाराचें ह्मणणें आहे. परंतु वीररसाला पोषक अशीही चाल या पदाला लावता येते, ही गोष्ट त्या टीकाकाराच्या लक्षांत आली नाहीं असें दिसतें हीं गीतें वरीच लोकप्रिय झालीं आहेत, व तीं त्या लोकमान्यतेस पात्र आहेत यांत मुळींच शंका नाहीं. राणी लक्ष्मीबाईचें मुळचेंच धाडसी शौर्य रा. तिवारींच्या स्फोटक वाणीनें विशेषच खुलून आलें आहे, हें नमूद करण्यास आह्मास फार आनंद वाटतो."

बाळकृष्ण अनंत भिडे.

**महाराष्ट्र--नागपूर ( ता. २६।७।२५ )**

"झांशीची दिगंतकीर्ती संग्रामदेवता राणी लक्ष्मीबाई यांचें अद्भुत वीरचरित या ऊर्जस्वल कवनांत तिवारींनीं वर्णन केलें आहे. सत्तावन सालच्या बंडांत राणी लक्ष्मीबाईनीं इंग्रज सेनापती सर ह्यूरोज याच्याशीं १२ दिवस सतत जें निकराचें युद्ध केलें त्याचें स्फूर्तिदायक शब्दचित्र इतिहासाचा अपलाप न होऊं देतां तिवारींनीं या कवनांत रेखाटलें असल्यामुळें हा त्यांचा काव्यग्रंथ महाराष्ट्रांत खचित लोकप्रिय होईल. तिवारींची वर्णनाची धाटणी साधी

पर्ण सावेश आहे. 'उद्धवा शांतवन कर जा' या प्रसिद्ध वृत्ताच्या चालींत हें हृदयभेदक वीरचरित त्यांनीं गुंफिलें असून रसापकर्ष प्राय: कुठेंच झालेला नाहीं. ......
.....कल्पना व भाषा या दोनही दृष्टींनीं हीं कवनें अत्यंत वेधक वाटतात. विशेषत: 'घनगर्ज गर्जली तोफ' 'काल्पीस करी कल्पांत' हीं कवनें अतिशयच जोरदार आहेत. राणी लक्ष्मीबाईंची पुण्यतिथी पाळण्याचा उपक्रम अलीकडे सुरू झाला आहे. त्या प्रसंगीं ही रसाळ कवनें ह्मणण्याचा जर प्रघात पडला तर आधुनिक कवीच्या वाणींत वीररसाची स्फूर्ति किती भरली आहे याची लोकांना कल्पना येईल. प्रस्तावनाकार प्रो. बेहेरे यांनीं ह्मटल्याप्रमाणें तिवारींची ही अष्टपदी महाराष्ट्रियांना खरोखरीच उद्बोधक होईल यांत शंका नाहीं."

## सुदर्शन–मुंबई (१९।४।२९)

"प्रसिद्ध मराठी कवि, लेखक आणि शाहीर दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यांनी या सुंदर कवितेत झांशीची राणी देवी लक्ष्मीबाई हिच्या समरचातुर्याचे मोठ्या बहारीचें वर्णन केलें आहे. काव्याचे १० प्रसंग असून ते एकाहून एक सरस आहेत काहीं वर्णनें तर अंगावर रोमांच उभे करणारीं असून 'शेवटचा संगरलीला' वाचून ज्याच्या डोळ्यांत अश्रु येणार नाहींत असा सहृदय मनुष्य क्वचितच सांपडेल:—

तेजाची तारा तुटली शौर्याची ज्योती विझली
कीं जय-ध्वजा कोसळली स्वातन्त्र्य-श्री मावळली
आशेची मंगलमाला विच्छिन्न होउनी पडली

हीं इतिहासाचीं पानें
वाचवतीं ना नयनानें
भिजतातीं अश्रुजलानें

स्फुरवी परि शाहीराला शेवटची समर-लीला

अशा प्रकारचें हें वर्णन तिवारींनींच करावें.

**प्रबोध--धुळें.** (ता. २४।७।२७)

"या पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघाली हेंच त्याच्या लोकप्रियतेचें पूर्ण द्योतक आहे. झाशीच्या राणी लक्ष्मीबाई काव्याचा विषय व तिवारी सारखे रंग भरणारे कवि असा योग असल्यावर काव्य सरस वठलेंच पाहिजे. पुस्तकास जबलपूर कॉलेजमधील प्रो. नारायण वेहरे ह्यानीं लिहिलेली एक सुंदर प्रस्तावना जोडण्यात आली आहे. व लक्ष्मीबाईचीं निरनिराळ्या प्रसंगाना साजेशी दोन तीन सुबक चित्रेंही समाविष्ट करण्यात आलीं आहेत. महाराष्ट्राला आज काल रडक्या काव्याची जरूर नसून वीरश्रीच्या काव्याची जरूरी आहे. व ती कवि तिवारी ह्याच्या संग्राम-देवतनें चांगली भागविली आहे असें आमच्यानें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं.

**वैनतेय —सांवतवाडी** [ता. २६।४।२७ ]

" जळगांवचे प्रसिद्ध कवि श्री. दु. आ. तिवारी यानीं हें काव्य लिहिलें असून अवघ्या दोनच वर्षांत त्याची द्वितियावृत्ति प्रसिद्ध होत आहे. यावरून तें किती लोकप्रिय झालें आहे याची कल्पना येईल. काव्याच्या प्रथमावृत्तींत त्याचीं आठ प्रकरणें होतीं. त्यानतर याच विषयावर लिहिलेल्या दोन प्रकरणाचा द्वितीयावृत्तींत समावेश करण्यात आला. हीं दहाही प्रकरणें मराठी नियतकालिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झाली असून तीं अनेकांनीं आवडीनें मुखोद्गत केलीं आहेत. ....काव्य एकदरींत परिणामकारक झालें आहे. सुटसुटीत साधी रचना हा तिवारींचा गुणही प्रस्तुत काव्याच्या लोकप्रियतेस पोषक झाला आहे. छापणी सुरेख असून किं. ८८ आहे."

**वऱ्हाड शालापत्रक-उमरावती (जून १९२७)**

" श्री तिवारी हे ऐतिहासिक गीतें रचणारे कुशल शाहीर असल्याबद्दल प्रख्याति आहेच. व ती या पुस्तकात द्विगुणित झाली आहे. पुस्तकात सत्तावन सालच्या बडाच्या धुमश्चक्रींत झाशीच्या रणशूर राणीनें जो पराक्रम गाजविला तो कवीनें गीतबद्ध केला आहे. पुस्तक वाचताना उत्साहाबरोबर अनुतापही उत्पन्न होतो. व शेवटीं

डोळ्यांतून टिपें पडल्याशिवाय रहात नाहींत. ह्या भावना शाहिराच्या प्रतिभेच्या द्योतकच होत. ”

आनंद-पुणें (मे १९२५)

“ झांशीच्या राणी लक्ष्मीबाईच्या चरित्रावर रचलेलें हें वीर रसात्मक काव्य रा. तिवारी याच्या हातून बरेंच चांगलें उतरलेलें आहे यांत शंका नाहीं. भाषा वीररसास अनुकूल, तेजस्वी व वाचकांच्या मनाला चटका लावून सोडणारी आहे. ”





देणार नाहिं कोणाशीं—आवडती माझी शाडी ( पान १ )

# झांशीची संग्रामदेवता.

## " आवडती माझी झांशी "

ज्या दिवशीं झांशी खालसा झाल्याचें मेजर एलिस यानीं झाशीच्या दरबारात जाहीर केलें त्या दिवशीं राणी लक्ष्मीबाई ह्या चिकाच्या पडद्याआड बसल्या होत्या त्यावेळीं त्यास किती दुःख झालें असेल ? त्या दुःखांत " मेरी झांशी नहीं देऊंगी ! " असे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले !

१

होईल खालसा झाशी     कीं होइल दत्तक मान्य
आशा कीं भव्य निराशा     प्रश्न हाच चिंताजन्य
ऐकाया निर्णय आले     पुरवासीही सन्मान्य

' खालसा जहाली झांशी ! '
झोंबले शब्द लक्ष्मीशीं
बोलली रेसिडेंटाशीं

' देणार नाहिं कोणाशीं     आवडती माझी झांशी '

२

आशेचा ताजमहाल     कोसळून खालीं पडला

न्याय-नीति दोघांमधला सोपान-मार्ग ढांसळला
सौख्याचा उडता हंस कायमचा उडुनी गेला
झाशीचे संगर-धीर
आठवले पूर्वज वीर
नेत्रांत चमकलें नीर
बोलली प्रीति विरहाशीं 'आवडती माझी झांशी'

३

ज्या झांशीसाठीं आम्ही खड्गाचें पाणी प्यालों
यत्स्वातंत्र्याच्या समरीं रक्तानें कितिदा न्हालों
स्वर्गाच्या द्वारावरतीं यत्कीर्ति लिहूनी घालों
मी विधवा अबला ऐशी
जाऊं तरि कोठें कैशी ?
अन्याय कथूं कोणाशीं ?
शूरता वदे दैवाशीं 'आवडती माझी झांशी

४

काळानें नेला पुत्र तो उदरीं शिरला घात्र
विधि तोडी मंगळसूत्र तो कठीं बसला घाव
कुलराज्यश्री मावळली हा असह्य शीर्षी घात्र
वेदना भयंकर झाल्या

ठाऊक तिच्या त्या तिजला
ना वर्णवती कोणाला
घोळती शद्ब कठाशीं 'आवडती माझी झाशी '

५

स्वामिनिष्ठ सेना तुटल्या राजनिष्ठ ढळढळ रडले
द्रव्याचे खजिने गेले कोपगारही हळहळले
अपहार मदाचा ढोल हुकुमाची भाषा बोले
हसीची सत्ता गेली
परक्यांची सत्ता आली
यक्षिणिची कांडी फिरली
हसीचे बोल उदासी 'आवडती माझी झाशी.'

६

सिंहिणिच्या कुहरामाजी बिनधोक मतंगज शिरले
नागिणिच्या वारूळात आनंदें मूषक घुसले
दुर्गेच्या दुर्गम दुर्गी दैत्यानीं ठाणें दिधलें
काल 'राजलक्ष्मी' सार्थ
आज नाव 'लक्ष्मी' मात्र
विविलीला होय विचित्र
लागली आंच हृदयाशीं 'आवडती माझी झाशी'

# " मर्दानी झांशीवाली "

झांशी खालसा झाल्यानंतर १८५७ सालीं स्वातंत्र्य-लक्ष्मीनें संचरित झालेल्या झांशीच्या लक्ष्मीनें सर ह्यू रोज सारख्या रणकला-पटूशीं १२ दिवस सारखें युद्ध केलें. इंग्रजांनीं झांशीवर कुलपी गोळ्यांचा भडिमार केला, किल्ल्यातील दारूचा भडका उडाला साह्याला आलेल्या तात्याटोप्यांच्या २० हजार फौजेचा पराजय झाला आणि शेवटीं तटाचा मुख्य दरवाजा फुटून शहरांत व तटावर गोऱ्या फौजेनें प्रवेश केला ! या संकटपरंपरेनें धैर्यवंतांचेंसुद्धां धैर्य ढांसळावयाचें; पण त्याचवेळीं ही धैर्यमेरूवरील अविचल तारा कमरेची नंगी तरवार उपसून तटावर छातीचा कोट करून लढली. तेथून बेफामपणानें शत्रूच्या पाठोपाठ शहरांत घुसली व तेथें त्यांची गर्दनबाजी केली तिच्या समशेरीला भिऊन पळालेले इंग्रज जेव्हां दुरून लपून छपून गोळ्या घालूं लागले तेव्हां तिनें आपल्या ढाला किल्ल्यांत फिरविल्या. तिच्या शौर्यानें आनंदित झालेल्या सर ह्यू रोजनें " मर्दानी झांशीवाली " असा तिचा गौरव केला.

१

झांशीच्या कुरुक्षेत्रामध्यें
गर्जना उठे भरतालीं
दाखवाया भाग्य कसाला

सिंहीण निजे घायाळ
स्वातंत्र्यच्छत्रा काळ
तेजस्विनि करि कल्लोळ

बुरुजा बुरुजावर मोर्चें
बांधोनीया तोफांचे
सजविलें सैन्य शूराचे
आपणही वेषें सजली मर्दानी झाशीवाली

२

यत्कर परिचित झालेले खड्गाच्या भव्य मुठीस
यत्कर्ण सदा उत्साही ऐकाया रणघोषास
यन्नेत्र नित्य अनुरागी आरक्त रणस्थानास
'ह्यू रोज' आंग्ल नरवीर
झांशीच्या तटावर शीर
आपटून झाला जेर
हिंदींत बोलला बोली 'मर्दानी झाशीवाली'

३

गर्नाळीं कुलपी गोळे खदिरांगारसम सुटले
पसरली लाल चादर कीं अवाऱ्या रात्रीं गमलें
धुम्-धडड्-धडड् नादें आकाश भरोनी गेलें
"घनगर्ज"[१] तोफ जैं गर्जे
मोर्चावर गोरे जे जे
त्याच्यात पलायन माजे

१ झांशीच्या किल्यावरील नामांकित तोफ

विजयिनी जयें फुरफुरली मर्दानी झांशीवाली

४

फितुरानें केली मात कलिजास पोंचला हात
दारूच्या कोठारात जेजालाची बरसात
किल्यात आणि नगरात मृत्यूचा प्रळयाकांत
शहराला जागोजागी
लागल्या भयंकर आगी
पाहिली प्रजा हतभागी
वात्सल्यें हृदयीं द्रवली मर्दानी झांशीवाली

५

'बोलवा गोशखानाला[१] बोलवा खुदाबक्साला[१]
गरगजाच्या बुरुजाला आणवा कडकबिजलीला[२]
भूतो न भविष्यती ऐशी उडवा दक्षिण बाजूला
जों तिसरा सुटला बार
तों कर्नल झाला ठार
नंतर चमके तलवार
तलवारींवरही रुढली मर्दानी झांशीवाली

६

पडघम बिगुलाच्या नादीं शिंगें कर्णांचे नाद

१ हे राणी लक्ष्मीबाईच्या तोफावरील हुषार गोलंदाज होते
२ झांशीच्या किल्यावरील नामांकित तोफ

खालीं वरती भरलेला संग्रामाचा उन्माद
चढल्या ईर्षेच्या शब्दीं चढल्या विजयाचे शब्द
जातीची अवला होती
युद्धकला ठाउक नव्हती
प्रबलांची केली माती
इतिहासीं गाजुन गेली मर्दानी झांशीवाली

७

उत्तरेस धुरळा दिसतो आशेनें राणी पाहे
"तात्या टोपे आले का?" उत्कंठा लागुन राहे
तों "तात्या आले आले!" आनंद गडांत न मावे
टोप्यांनीं टोपीवाले
समशेरीवरतीं धरिले
एकदांच चालुन गेले
इकडे चपला चकमकली मर्दानी झांशीवाली

८

युक्ती-युक्तीचें युद्ध शक्तीला गिळुनी बसलें
पहिलीच फळी जों आली फोडून रिसाले गेले
'दे माय धरणि गे ठाव' ऐसें सकलांना झालें
स्वारांचा पायदळांचा

हल्ला चढला जोराचा
दळभार पळे त्याचा
थरकेना हिंमतवाली मर्दानी झांशीवाली

९

द्वादश दिवसापर्यंत एकटीच झुंजत होता
साह्याला टोपे आले त्याची गति ही उफराटी
सर ह्यू रोजाच्या कुमकीं दररोज पलटणा येती
आगीची होउन लाही
शत्रुत्व भक्तला वाही
भवितव्यतेस ना पाही
भीतीही तिजला भ्याली मर्दानी झांशीवाली

१०

धैर्याच्या मेरूवरची तेजस्वी अविचल तारा
शौर्याच्या जलनिधिवरची भीषण सिंधूची धारा
जमवोनी सगरशूरा बोले ती धीरोदारा
"व्यर्थ-ती पराची आस
आपुल्या बळाची कास
घालून जपा झांशीस"
उठली आवेशें भरली मर्दानी झांशीवाली


झांशीची
संग्राम देवता
राणी लक्ष्मी

११

पायजमा पायीं शुभ्र गहिरा अंगरखा अंगीं
कमरेस दुपेटा भारी समशेर लटकली जगीं
शोभली शिरीं चदेरी सुंदर बत्ती नारिंगी
झांशीच्या सौभाग्याची
मूर्तिमत लक्ष्मी साची
देवता रणस्थानाची
किल्ल्यातुन बाहिर आली- मर्दानी झांशीवाली

१२

इंग्रजी रिसाले पुढतीं क्यॉप्टिजंट फौजा मागे
दारावर दौडत आले लेफ्टनंट कर्नल वेगें
इकडे ही हुल्लड, तिकडे बावटा तटाला लागे
अरबांची बुंदेल्याची
कर्नल क्यॉप्टन गोऱ्याची
पाहून झुंज निकराची
उफळोनी नागिण आली मर्दानी झांशीवाली

१३

पहिल्या झेपेनें घेई 'मिकलीजाना' ची जान
दुसऱ्या उसळीनें घेई 'बोनस-फॉक्सा' चे प्राण

'डीकाला' केला शीक मुरडून हात मारून
'स्टूअर्ट' 'लोथ' दोघानीं
गर्दीत शिड्या लावोनीं
चढविलें सैन्य, पाहोनी
चवताळुन वाघिण गेली मर्दानी झांशीवाली

१४

गिरिवरची जैसी सरिता तट भिजवित पुढतीं जाते
झंझावाताची लहरी उच्छेदित वृक्षां जाते
घनमंडलिं जैशी बिजली जेथें तेथें लखलखते
कीं भूकंपाची लहरीं
अचलांसहि कांपविणारीं
सर्वत्र फिरे अनिवारी
सर्वांगीनि तैशी गमली मर्दानी झांशीवाली

१५

आरक्त उषा ती गमली आरक्त चंडिका गमली
सतप्त भासली संध्या सतप्त भासली काली
संक्षुब्ध तिच्या नेत्रांत क्रोधाची चढली लाली
लखलखाट मार्तंडाचा
चकचकाट पूर्णेंदूचा

दाविला खेळ तेजाचा
रक्तानें शरिरीं न्हाली    मर्दानी झांशीवाली

१६

पुढचा दरवाजा फुटला    बाणीचा तटही गेला
सुंदरिचे हात न पुरले    अष्टदिशा सावरण्याला
कावरीबावरी झाली    शहरांत घोळका घुसला
शत्रूच्या पाठोपाठ
अरबी लढवय्यासहित
घातली उडी शहरात
करि कत्तल हिय्येवाली    मर्दानी झांशीवाली

१७

छातीस लागतां छाती    संगीन सरकली मागें
तरवारीवर तरवार    खणखणाट होऊं लागे.
अरबांनीं बेहोषानें    शिरकटाई केली वेगें
सरमिसळ होउनी राणी
गर्दनबाजींत शिरोनी
गेली होती रंगोनी
शिरशिरी भरोनी लढली    मर्दानी झांशीवाली

१८

झाडाच्या मागें कोणी झुडपाच्या मागें कोणी
पडवीच्या मागें कोणी वळचणिच्या मागें कोणी
भीतीनें लपुनी-छपुनी सोडिती बंदुका दुरुनी

चहुंकडून आल्या टोळ्या
त्याच्याही सुटती गोळ्या
किल्ल्यात फिरविल्या ढाला

मर्दांना मर्दुनि गेली मर्दानी झांशीवाली

१९

रणकलाकुशल वीरांनीं कौशल्य गाइलें जीचें
गुणवंत ग्रंथकारांनीं ग्रंथिले समरगुण जीचे
पोवाडे गावे वाटे स्वातंत्र्याच्या हिरकणिचे

स्फूर्तींचे वळसे दिधले
मृत पौरुष जागृत केलें
हतबल बलवत्तर केले

भारतास भूषण झाली मर्दानी झांशीवाली

# " घनगर्ज. "

सातव्या-दिवशीं तर विलायती तोफखान्यानें झाशीवर कहर करून सोडिला. बुरुजावरील मोर्चांवर मनुष्य ठरेनासा झाला तेव्हा लक्ष्मीबाईनें तोंडास तोंड देण्याकरितां आपली नामांकित " घनगर्ज " तोफ सुरू केली. तिच्या भीषण गडगडाटानें दशदिशा दणाणून गेल्या व भयंकर भडिमारानें इंग्रजाचा तोफखाना बंद पडला; इतकेंच नव्हे तर सर ह्यू रोजाला आपली छावणी माऱ्यातून मागें सरकवून घ्यावी लागली ! !

१

जैं विलायती तोफांनीं झाशीचे केले हाल
पेटला गणेश महाल पेटला विलासमहाल
ऐश्वर्य आणि सुंदरता फुटलें फुटलें तद्माळ

' घनगर्ज ' शत्रुसहारिणी
जणु काळाची ती भगिनी
मोर्चांत तिला ठासोनी

प्रगटना लक्ष्मिचा कोप घनगर्ज गर्जली तोफ

२

भूधर शेषाचें शीर्ष भीतीनें कापविणारी
नाभी कमलाच्या विधिला चल-विचलित जी करणारी

देवांच्या सम्राटाचें सिंहासन हालविणारी
गर्जना अशी जैं झाली
स्त्रीगर्भहि ढळले खालीं
धडकी वैऱ्याना भरली
पळतांना करिति विलाप "घनगर्ज गर्जली तोफ!"

३

वीरांचें सुटलें धैर्य वीराचे थिजलें वीर्य
प्रगटलें परचमूमध्यें भीषण काळाचें क्रौर्य
सर ह्यू रोजाला गमले तें सकट बहु अनिवार्य
नभ तदा प्रतिध्वनि देई
दिग्गिरी प्रतिध्वनि देई
महि नभास भेटू पाही
ऐसा दावित प्रताप घनगर्ज गर्जली तोफ

४

झाकून सूर्य–गोळाला चमकवी गोलसूर्यातें!
उडवीत मागुनी ठिणग्या दिवसाच मिरवि तारांतें!
त्या ग्रीष्मऋतूच्या कालीं उमवी वर्षाकालातें!
कर्तुमकर्तुम् शक्ताचा
यत्प्रभाव कुठवि वाचा

चढुनी शिखरीं त्वेषाच्या

पाप्यांचें मोजित पाप घनगर्ज गर्जली तोफ

५

दुर्बीण लाविली ज्यानें त्यावरीच धरिला नेम
उडविला यशस्वी बार दाविलें यमाचें धाम
पळताना मोर्चेवाले झाले किति धामधूम

पैजीवर लावुन पैज
चतुराई गोलदाज
दाखवीत होत आज

श्वासून दारुची वाफ घनगर्ज गर्जली तोफ

६

ठासतो एक जों दारू तों दुजा चढवितो गोळा
आगीचा तोडेवाला निरखुन मोहऱ्या मोहऱ्याला
गडगडाट करण्या लावी त्या निनादिनी तोफेला

प्रत्येक निनादासरसे
धूमकेतु उगवत होते
भीषण नभ भासत होतें

रिपुमदास लावित धाप घनगर्ज गर्जली तोफ

७

रोमांच उठति जों देहीं तों होय देह विच्छिन्न
कांपरे भरे करचरणीं करच ण होति तनुभिन्न
धडकी भरली जों हृदयीं तों हृदय होय सचूर्ण
निर्मनुष्य केले मोर्चे
धमधम्यांत जेजालांचे
सापळे उभे तोफांचे
अपजयास मारुन थाप घनगर्ज गर्जली तोफ

८

राणीचे गोलंदाज स्फूर्तींच्या शिखरीं चढले
विजयोत्सहाची सरिता राणीच्या हृदयीं खेळे
नेमाचा सुटतां बार "शाबास बहाद्दर!" बोले
छावणी सरकली मागें
पलटणी सरकल्या मागें
त्या भडिमाराच्या योगें
शमवीत असा रिपुताप घनगर्ज गर्जली तोफ


९

दास्याची कैदासिण जी अस्मान तिला दावाया
परवशता जखिणीच्या कीं ठिकऱ्या ठिकऱ्या उडवाया

या सुवर्णभूमीचें ते स्वातंत्र्य रुचिर राखाया

राज-लक्ष्मिची गुणवती
शूरलक्ष्मि ती यशवती
घनघोर युद्ध करि अती

तिज धाया साह्य अमूप घनगर्ज गर्जली तोफ.



# "फेकला तटाहुन घोडा!"

इंग्रजांच्या बलाढ्य फौजेशीं झांशीची लक्ष्मी सतत १२ दिवस अमानुष पौरुषानें लढली. शत्रूनीं झांशीचें तर केवळ स्मशान करून सोडिलें. त्याची चहुंकडून हुल्लड उठली व ती किल्ल्यापर्यंत पोंचली. किल्ल्याच्या मुख दरवाजाचें रक्षण करणारे राणीचे चतुर गोलंदाज 'कुंवर गोशखान' व 'गुलाम खुदाबकस' हेही गतप्राण झाले. आतां हस्तगत होऊन देहाचे हाल करून घेण्यापेक्षा शत्रूची फळी फाडून बाहेर पडावें आणि काल्पीस नानासाहेब व तात्याटोपे यांस जाऊन मिळावें असा तिचा धडाडीचा निश्चय झाला. तिनें आपल्या प्रियपुत्रास पाठीवर बांधिलें, आवडत्या खंद्या घोड्यावर चढली आणि बरोबरच्या निधडक धैर्यवान सेवकांसह तिनें उत्तर दिशेनें भर सैन्यात तटाहून घोडा फेकला व फळी फोडून निघून गेली! सर ह्यू रोजसारखा चतुर सेनापती पण तोही तिच्या या अचाट धैर्यानें चकित झाला. त्यानें लेफ्टनंट बौकर यास तिच्या पाठलागावर पाठविलें. सकाळीं झांशीप्रांताच्या सरहद्दीवर ती मुलास फराळास घालीत असतां बौकरची दौड तेथें जाऊन भिडली तिनें चपळाईनें मुलास पुन्हां पाठीवर बांधिलें आणि घोडेस्वार होऊन तरवारीच्या पहिल्याच खणाखणींत बौकरला घायाळ करून निघून गेली!

१

लक्ष्मिचा धैर्य-तट अढळ जरि झांशीचा तट ढळला

तन्निश्चय बुरुज न हाले एकेक बुरुज जरि पडला
परि वेढ्याच्या पाशानीं जखडाया वैरी सजला
काळकंठ जे चिरतील
जीवास जीव देतील
घेऊन असे रणशील
फोडाया दुर्गम वेढा, फेकला तटाहुन घोडा

२

मर्दानी बांधुन फेटा चिलखत चढवी अंगांत
जहरी जंबिया कंबरेला नंगी समशेर करांत
पाठीस बांधिला पुत्र कुरवाळुनि वात्सल्यांत
'अस्मान फेक' जातीच्या—
वेगीं चढत्या छातीच्या—
तुरगीं चढली त्वेषाच्या
सरकावुन मागें थोडा फेकला तटाहुन घोडा

३

नभ विदारुनी तेजस्वी ही वीज उडाली काय?
भीमाच्या हातामधली कोसळे गदा कीं काय?
निखळुनी स्वर्गद्वाराची अर्गलाच पडली काय?
क्षण भास असा तैं झाला

प्रत्येक पहारेवाला
विस्मित होवोनी ठेला
दाखवीत गगनक्रीडा फेकला तटाहुन घोडा !

४

दचकले कडाबिनवाले गोंधळले बंदुकवाले
सरले समशेरीवाले हटलेही संगिनवाले
उचलोनी सिंहिण गेली चित्रापरि सारे ठेले
जो मान वळवुनी बघती
तो प्रभावती लक्ष्मी ती
जाय दिगंतराच्या अंतीं
ती अडली नाहीं थोडा फेकला तटाहुन घोडा !

५

शत्रूची विजयी टोपी टापेनें उडवुन दिधली !
उतरली मिशी चढलेली प्रबलांतुन अबला गेली !
लफटनंट बौकर धावे स्वारांची घेउन टोळी !
वायूची लहरी चाले
दर्याची लहरी हाले
अधिकाधिक अंतर पडलें
रागात नवल करि वेडा फेकला तटाहुन घोडा !



फेकला 'तटाहुनि घोडा.'

६

भिडविली एकदा माड        रतिभरही चळली नाहीं!
मारिली एकदां टाच        ती पुन्हा शिवविली नाहीं!
रिकिबीचा चढता पाय        थोडाही ढळला नाहीं!
अग्नीच्या झटक्यावरती
घोड्याला खुणवित होती
शर्यतींत धावत होती
तिज काय अडवि नदि-ओढा फेकला तटाहुन घोडा!

७

देह जरी चाले पुढतीं        प्राण तरी होता पृष्ठी
चौखूर उधळतां घोडा        तोलून धरी सुत-यष्टी
तो कण्हून 'आई'! वदतां        अंतर्यांत होई कष्टी
सोडिला तिनें दौलतिचा
वाडा तो समृद्धीचा
परि एकच तो लोभाचा
पाठीला घेउनि वाडा        फेकला तटाहुन घोडा!

८

सारीत तम पट आली        ती उषा पूर्व-दिक्क्षितिजी
स्वातंत्र्य-गोल सूर्याचा        सरसरला व्योमामाजी

आवरी जरा लक्ष्मी ती झांशिच्या सिमेवर वाजी
सोडिला बाळ पाठीचा
घास त्या दिला प्रेमाचा
दिसला घोडा बौकरचा
ही तेव्हाची रिपु-पीडा फेकला तटाहुन घोडा !

९

चपला जों चपळाईनें पाठीस बांधिते बाळ
मारिते टाच घोड्याला तों बौकर भिडला काळ
मारिला हात उलटून उलथला दुष्ट घायाळ
वृक्षांच्या शिखरावरुनी
उधळली धूळ पसरोनी
दास्याचा पायांतूनी
तेव्हाच तोडिला खोडा फेकला तटाहुन घोडा !

१०

राष्ट्राच्या कल्याणार्थ कल्याणिनि करि कल्लोळ
तीं प्रिय भारत-भाग्यार्थ भागीरथि झाली लोल
आर्यांचे बघुनी हाल हालवी मही-दिग्गोल
मर्दानी झांशीवाली
परवशता पायाखालीं
चिरडून निघे जयशाली
स्वातंत्र्याचा मनिं ओढा फेकला तटाहुन घोडा !

# " झांशीची बींजन झाली ! "

राणी लक्ष्मीबाई झांशीहून निघून गेल्यानंतर तिच्या पराक्रमी विरोधानें संतप्त झालेल्या गोऱ्या पलटणी शहरांतून घुसल्या व त्यांनीं ३ दिवस झांशीची बीजन चालविली त्या भयंकर प्रसंगाचें वर्णन काय करावें !

१

झांशीची माता गेली पोरकी जहाली झांशी
वात्सल्य-मंदिरीं शिरली पर-निष्ठुरता छळण्यासी
उघडला मृत्यु-दरबार वर्णावें केंवि तयाशीं ?
बाल-वृद्ध कीं स्त्री-पुरुष
कोणीहि दिसो समयास
सरलें त्याचें आयुष्य
सरसहा चालली गोळी झांशीची बीजन झाली

२

पुरवासी हतभागी ते पळती मार्गीमार्गीत
मागून घालती गोळ्या लष्करी यमाचे दूत
कारुण्याचे आलाप विरले वातावरणांत

१ दिसेल त्यास गोळीनें ठार मारणें

लागतां पतीला गोळी
फोडिते पत्नि आरोळी
तों तत्प्रेतहि ये खालीं
प्रीती रक्तांत बुडली झांशीची बीजन झाली

३

अनिवार जीवाची आशा दुर्बल निःशस्त्र जनांत
तळघरांत कोणी दडती कुणि लपती माजघरांत
शिरले कोणी कूपांत उतरले कुणी वापींत
अंतक आरोळ्या देत
शिरले सदना सदनात
उठला एकच आकांत
सदनें रक्तानें न्हालीं झांशीची बीजन झाली

४

सभ्यता नीति मर्यादा सूळावर सगळ्या चढल्या
लावण्यवती किति ललना निज कुळीनतेला मुकल्या
आसुरी अघोरी तृष्णा सर्वस्वी तृप्त जहाल्या
सद्दीचा जोंवर जोर
कोणीही तोंवर थोर

दीनांना नाहक घोर
मृत्यूचे लेखच भालीं झांशीची बीजन झाली

५

पुत्राला कळवळींत असता पुत्रासह माता गेल्या
ज्यांचा कर पतिकंठांत त्या पतिसह फत्नी गेल्या
भगिनी-पुढती प्रियबंधू बधुपुढें भगिनी मेल्या
सूडाची सीमा झाली
शहराची होळी केली
नभ दाटे धूम्र-ज्वालीं
निर्दयता तरिहि न धाली झांशीची बीजन झाली

६

जी ऐश्वर्यें शोभावी उत्तरादिशेची भगिनी
जी शौर्यानें विलसावी दक्षिण देशाची रमणी
जी प्रजा-रजनीं गाजे पूर्व आणि पश्चिम जननी
ती झांशी होय हताश
कठास लागला फास
धि:कार असो काळास
कोणीहि न उरला वाली झांशीची निर्जन झाली

७

जीवाचे पची सारे रुदनाला शद्बच नाहीं
जिकडे तिकडे शव-राशी उचलाया कोणि न येई
प्रेताजवळीं जो जाई त्याचेंच प्रेत तै होई

आनंद-विलासोपवन
जाहलें स्मशानस्थान
धन-धान्य उरे कणही न

लक्ष्मीसह लक्ष्मी गेली झाशीची वीजन झाली

# "सांभाळा ही तलवार"

राणी लक्ष्मीबाईनीं झांशीच्या तटाहून घोडा उडविल्यानंतर २४ तासांत १०२ मैलची दौड करून ती काल्पीस पोंचली आणि तेथें नानासाहेब व रावसाहेब पेशव्यांपुढें तेनें आपली तलवार ठेवून दिली ! झाशीवर एवढा कहर गुजरला तरी पेशव्यांची मदत झाली नाहीं यामुळें तिला फार वाईट वाटलें होतें

१

धूळीनें भरला देह घामाच्या गळती धारा
हृदयास उदासी आली आशेच्या तुटल्या तारा
सूडास निराशा झांकी वणवा तो आंतच सारा
झांशीस चंग बांधोनी
काल्पीस तंग सोडोनी
भेटतां पेशवे दोन्ही
लक्ष्मीचा कठोद्गार 'सांभाळा ही तलवार !'

२

"आपण दख्खनचे स्वामी आह्मी अपुले सरदार
झांशीवाल्यांच्या कटिला बांधिली तुह्मी तलवार
सेवेला सादर झालों तळहातीं घेउन शीर

आह्मी बुडलों सिंधूत
सन्निध असता श्रीमन
पाहिला आमुचा अन
कर्तव्यास न आधार सांभाळा ही तल्वार

३

जय-सिंह समर-सिंहांचें हें कर-भूषण वीरांचें
स्वातंत्र्य-समरदेवी जी हें अनर्घ आसन तीचें
राष्ट्राच्या द्वारावरचें हें तोरण मांगल्याचें
विधवेच्या हातीं आलें
निर्माल्य जिवाला केलें
निर्माल्य न होऊं दिधलें
उतरला शिरींचा भार साभाळा ही तलवार

४

चोविस पन्हीच्या तोफा छत्तीस पन्हिच्या तोफा
धाडसी धमक धरणारा नौ वीस हजारी ताफा
दळभार फिरे टोप्यांचा झाशीहुन टाकित धापा
असहाय अशा त्या काळीं
संचरता देहीं काली
हातांत मूठ जी आली
भिजविली तिची मी धार साभाळा ही तल्वार

५

पुरुषसिंह आपण असता झाशीस लागली फांशी !
प्राणांत तिची दुरवस्था बघवली तुम्हा तरि कैशी ?
लागता सुरी कंठाग्र देशाला निद्रा कैशी ?
पाहिजे समयसूचकता
पाहिजे दूरदर्शकता
त्याविना ध्येय-निष्फलता
मज दिसे न आतां सार 'सांभाळा ही तलवार

६

झांशीचा जो इतिहास त्याचीं शेवटचीं पानें
लेखणी करुन खड्गाची मी लिहिली नर-रुधिरानें
स्वातंत्र्याच्या देवाला जागविलें कर्तव्यानें
जरि अपुली मिळती जोड
तरि यशास नव्हती तोड
आता उठलेले फोड
सलनात अतरीं फार सांभाळा ही तलवार

७

स्वातंत्र्य-युद्ध शेवटचें झांशीवर झालें जेव्हां
हाकली असेक समार्था शिवछत्रपतींची तेव्हां

डोळदी असेल समाधी    शिवनेरीचीही तेव्हा
आहे हा काळ अनंत
आहे हें विश्व अनंत
झांशीची कीर्ति दिगंत
चिरकाल करील विहार    सांभाळा ही तलवार "

८

हिमशृंगें वितळुनि गेलीं    भागीरथि सलिलें भरली
रविकिरण सलिलमय झाले    धनुराकृति सुंदर खुलली
दल-विकाचित पद्में झालीं    श्रीलक्ष्मी तेथें नटली
डोळ्यांत आणुनी पाणी
श्रीमंत पेशवे त्यांनीं
तलवार दिली, बोलोनी—
'तुमचाच अह्मां आधार    सांभाळा ही तलवार '

# “कालपीस करी कल्पांत”

**झांशीच्या** तटाहून घोडा फेकून निघून गेल्यानंतर राणी **लक्ष्मीबाईनें** मुलाला पाठीला बांधलेल्या स्थितींत अन्नपाण्यावांचून २४ तासांत काल्पिपर्यंत १०२ मैलाची मजल मारिली! तेथे **नाना-साहेब, तात्या** टोपे व **बांदेवाले** नवाब यांच्या फौजांची तिनें विलक्षण रचना करून **कालपीचा** कोट दुर्भेद्य केला **पेशव्यांनीं** या सेनेचें आधिपत्य त्या चतुर साम्रामिकेकडे द्यावयास हवें होतें तिनें आपले लालवर्दीचे निवडक २०० लोक घेऊन यमुनेकडची बाजू सांभाळली. **तात्या टोपे, बांदेवाले नबाब** यांचा जेव्हां **कुंच** व **कालपी** यांच्या अघाडीवर पराभव झाला तेव्हा नानासाहेबासहित सर्वच पलायनाचा विचार करूं लागले! **राणीनें** त्यास धीर दिला व आपला उमदा घोडा पुढें काढून लालवर्दींच्या लोकानिशीं **इंग्र-जांच्या** नामांकित तोफखान्यावर २० फूट अंतरापर्यंत बेधडक चाल केली व तो बंद पाडला! तिच्या या वेळच्या भयंकर वीरश्रीनें व अचाट पराक्रमानें **कर्नल, कॅप्टन** वगैरे इंग्रजवीर हतवीर्य होऊन रण सोडून पळूं लागले! तिनें या कालपीच्या युद्धात शौर्याचा कल्पांत केला तेव्हा ऐनवेळी सेनापति **सर ह्यू रोज** हा आपला उटावरचा तोफखाना घेऊन धांवत आला त्यानें **पेशवे** व **नबाब** यांना उधळून लाविलें व अशाप्रकारें **राणीची** पिछाडी तोडिली! तरी देखील त्या तेजस्वी योद्धयाला या एकट्या तेजस्विनीनें चांगलेंच तेज दाखविलें, आणि पुन्हा डोळ्यादेखत घोडा उडवीत निघून गेली!!

१

झांशीच्या किल्ल्याचे पडसाद श्रवणीं येतीं
उन्मत्त शत्रुचीं कृत्यें हृदयाचीं शकलें करितीं
नाचवीत कोप-भ्रुकुटी काल्पीवर ये लक्ष्मी ती

सागरास आली भरती
धैर्याचे सेतू बुडती
त्यांवरि लहरी नाचे ती

सळसळुन रक्त देहात काल्पीस करी कल्पांत

२

टोप्यांनीं केली कूच कुंच्यावर डेरे दिधले
बाणपूर बारेवाले ढाला बांधोनी गेले
स्वातंत्र्यविजयदेवीचीं उत्साही जमलीं बाळें

शौर्यांत कुशलता नव्हती
धैर्यांत चतुरता नव्हती
मळवून पताका येती

ज्वालेपरि लक्ष्मि नितांत काल्पीस करी कल्पांत

३

चौफेर उभारुनि तोफा काल्पीचा केला कोट
निवडुनी पठाणी फौजा बांधिला तयाचा गोट

सकलांनीं निश्चय केला    यमुनेचा प्राशुन घोट
श्रीमतांची श्रीमती
यशवंताची यशवंती
कीं मेघानिल चपला ती
चमके स्वातंत्र्योद्भ्रांत    काल्पीस करी कल्पांत

४

तोफास लागतां तोंडे    उधळले रिसाले घोडे
बोनीवर निधडे निधडे    स्वर्गाचे बघती वाडे
आग्लवीर गाढे गाढे    भीतीनें झाले वेडे
केवळ शौर्याची ज्वाला
काळी जहरी अहि-बाला
गमली सर ह्यू रोजाला
ऐशा शौर्यावेशांत    काल्पीस करी कल्पांत

५

स्वातंत्र्येच्छा ती इकडे    तिकडे अधिकारोन्माद
रणभेरी गर्जति इकडे    तिकडे बिगुलांचे नाद
निश्चयी वृत्तिचा जोर    सूडाला करि अवरोध
दाढीवर चढवुन वादी
हायलंडर ते बेदर्दी

छबिन्यार करिती गर्दी
अधरोष्ठीं चडला दात   काल्पीस करी कल्पांत

६

हुजुरातीच्या बाजूला   हल्लयाच' चढवित हल्ले
स्टूअर्ट आणि रॉबर्ट   सरसावुनी पुढतीं आले
टोपे, नानासाहेब   भारतीय शौर्यें लढले
योजून देहसकल्पा
रोखून भयंकर तोफा
वदती कीं "काप', कापा!"
उडविला असा आकांत   काल्पीस करी कल्पांत

७

शत्रुच्या पौरुषावरतीं   फेकले निखारे तीनें
डुलणारे मत्त गजेंद्र   'किर्र किर्र' केले तीनें
मर्दुमकीच्या मगरीचे   पाडियले दांत बलानें
"पूर्वींच्या निज कार्तीची
'सेनापति' या पदवीची
लाज कैवि राखायाची?"
करुनी रिपु चिंताक्रांत   काल्पीस करी कल्पांत

८

लेफ्टनंट, कर्नल वदती, 'लक्ष्मीनें केली शर्थ'
हतवीर्य ब्रिगेडिर वदती 'राणी रणचतुर समर्थ'
त्या गुणज्ञ सेनानींना धिक् गमला निजपुरुषार्थ
डोळ्यांत लक्ष्मिची मूर्ति
हृदयात मृत्युची भीती
बावरून गेली वृत्ती
खड्गावर चढवुनि हात कालपीस करी कल्पात

९

कडव्या हायलंडर सेना संगिनिवर जय मिळवाया
पलटणी हैदराबादी बंदुकिचें बल दावाया
वेगानें दौडत आल्या काळाची मोजित छाया
"झाशीचा घ्या घ्या सूड
उकला स्वयशाचें गूढ "
गर्जे ती अश्वारूढ
शिरली कापाकापींत कालपीस करी कल्पांत

१०

भरवसा जयाचा त्यानीं अगदींच गाळले हात !
राखावी पाठ जयांनीं त्यानींच फिरविली पाठ !

जीवाचे रक्षक सारे शोधिती पळाया वाट !
दाबून अश्व मांडीनें
दाबून खड्ग हातानें
राजेश्वरि सतापानें
उसळली उग्र-रूपांत काल्पीस करी कल्पांत

११

उमद्या घोड्याच्या टापा 'खाड खाड' उडवित आली
प्राशून आग तोफांची मोर्चात चढाई केली
गोऱ्या तोंडावर गोरी खिन्नता चढविती झाली
ती धरून ज्यावर रोख
करि समशेरीची फेंक
तो सोडी हा भू-लोक
लाली चढली नेत्रांत काल्पीस करी कल्पांत

१२

नामर्द जाहले मर्द मर्दानीच्या शौर्यानें
हत-विक्रम विक्रमवंत केले विक्रमवतीनें
पौरुषास पुरुषार्थाला सजविलें प्रभावंतीने
गिरि गिरीवरी आदळले
घन घनावरी कोसळले



उमद्या घोड्याच्या टापा—'खाड खाड' उडवित आली
प्राशून आग तोफांची—मोर्चात चढाई केली (पान ३६)

भू-स्वर्ग एक तैं झाले

रक्ताच्या वर्षावात कालपीस करी कल्पांत

१३

सेनानी ह्यूरोजाचा उंटाचा भव्य रिसाला
आगीला वर्षत आला गत-यशास रक्षायाला
जयमरण-निश्चयें सजली ती विद्युला संग्रामाला

रणवीर आंग्लनर-योद्धा
रणरागिणि ही कटिबद्धा
अत्यंत जाहली क्रुद्धा

महिषासुरमर्दिनि मूर्त कालपीस करी कल्पांत

१४

मोहिनिच्या आविर्भावें भस्मासुर नाचत होता
यमुनाजललहरी-संगें कालिया उफाळत होता
ज्योतिष्मतिच्या तेजात धूमकेतु चमकत होता


दोनशें लोक राणीचे
पर्वतप्राय देहाचे
शर्थीनें लढले साचे

उत्साह तयाना देत कालपीस करी कल्पांत

१५

एकाच चंडिकेवरतो चवताळुन राक्षस गेले
एकाच मंदिरेभवती ते अभद्र सारे जमले
ता कल्लोलिनि तन्मार्गी पाषाण आडवे आले
वळसे घेवोनी नाना
उत्सारित सन्नद्धाना
गेली—जातां जाताना
या प्रिय **भारत-भाग्यार्थ** काल्पीस करी कल्पांत

---



# " पळविला वीर विद्युलतेनें "

झांशीच्या लक्ष्मीने काल्पीच्या युद्धात शौर्याचा कालपात केला, तथापि असहाय स्थितींत तिला आघाडीवरून आपला घोडा फिरवावा लागला. तरीहि त्या धैर्यवंतीचें धैर्य रतिमात्र ढळलें नाहीं. ' आता काय करावें ? " या विचारात नानासाहेब, रावसाहेब तात्याटोपे, बांदेवाले नवाब हे पडले असतां त्या कल्पक राणीनें ग्वाल्हेरचा किल्ला सर करण्याची अजब युक्ति काढिली ग्वाल्हेरचे शिंदे बहुधा आपणास अनुकूल होतील या भ्रमानें सर्वांनी ग्वाल्हेर पासून ५।७ कोसावर तळ दिला व शिंद्यास निरोप पाठविला. इंग्रज बहादुराचे राजनिष्ठ तरुण मांडलिक ' जयाजीराव शिंदे ' आपल्या बालेघाटी फौजा घेऊन नामांकित तोफखान्याची गर्जना करीत एकदम युद्धास आले शिंद्याचे गोळे छावणींत धडाधड येऊं लागले; तेव्हां कुठें तात्याटोपे सावध झाले ! आपली कल्पना व योजना निष्फल होणार, हे पाहून राणीनें आपल्या निवडक लोकानिशीं शिंद्याच्या तोफखान्यावर चाल केली व तो बंद पाडला शिंद्यांच्या मिजाशी ऐटदार बालेघाटी फौजाचा तिनें धुव्वा उडविला व बुंदेले ठाकूर पल्टणींची दाणादाण केली एका बाजूला राजनिष्ठेनें प्रेरित झालेला तरुण नरवीर आणि दुसऱ्या बाजूला हातातील तरवार हीच विजय-पताका मानून स्वातंत्र्याकरितां देहार्पण करावयास सिद्ध झालेली एक अबला या दोघांची रणमैदानांत निर्वाणीची झुंज झाली शेवटीं अपजयी जयाजीरावास जीव बचावण्याकरिता भरयुद्धांतून पळावें लागलें, त्यानीं आग्र्यास जाऊन इंग्रजांचा आश्रय केला '

१

काल्पीच्या रणरंगांत रिपु-रुधिरानें नटलेली
ग्वाल्हेरींच्या वेशींत स्वातंत्र्यदेवता आली
तों ऑंग्ल-राजनिष्ठेची शिंद्यांना चढली लाली

तोफांचे उडवित गोळे
जयवंत 'जयाजी' आले
लक्ष्मीचे फिरले डोळे

उसळली शौर्य-तेजानें पळविला वीर विदुलेनें

२

दिलजान शिकदर गाझी शिंद्यांचे गोलदाज
लाल लाल चढवित होते गोळ्यांचा गगनीं साज
टोप्यांच्या मारागिरीनें कांपले न हिंम्मेबाज

परि झांशीच्या लक्ष्मीची
उसळला माड जोमाची
तोफांत तुमुल रक्ताची

जाहली वृष्टि वेगानें पळविला वीर विदुलेनें

३

श्रीमंत 'रावसाहेब' दंगलींत दंग जहाले
सेनापति तात्याटोपे दलभंजनिं मग्न जहाले

शिंद्यांचे दौलतजादे गळले, हटले न हटले
झाला शत्रूचा जोर
तुटला हिंमतीचा दोर
तो समय पाहुनी घोर
घातली उडी राणीनें पळविला वीर विदुलेनें

४

तिकडे जयशाली योद्धा इकडे दुर्दैवी अबला
तिकडे चमु बालेघाटी इकडे तर लाल रिसाला
तिकडे धुमसे स्वार्थाग्नी इकडे स्वातन्त्र्य-ज्वाला
गांठ जैं वीर-वीदुलेची
सगरात झाली साची
तैं होय झुंज निकराची
शेवटीं गलित-धैर्यानें पळविला वीर विदुलेनें

५

हटले जैं बालाघाटी बुंदेले ठाकुर आले
वीराच्या ढालांवरतीं खड खड नव-खड्ग उडाले
देऊन सलामी त्यांना लढले तैं बादेवाले
बाद्याचा तुटता बांध
शिंद्याचा विजयानद

क्षण नाचे जों स्वच्छंद
तों रणलीलावंतीनें पळविला वीर विदुलेनें

६

ती राष्ट्राची भव्येच्छा स्वार्थैक-वृत्तिला चिरडी
ती देशाची संस्फूर्ती उसन्या हिंमतीला रगडी
ती स्वातंत्र्याची शक्ती दास्याची दाबी नरडी
बुंदेले ठाकुर यांचा
कसलेल्या लढवय्याचा
धीरच सुटला सकलाचा
काढिला पाय शिंद्यानें पळविला वीर विदुलेनें

७

हननोद्यत-कर चंडीचा नाचे नित शीर्षावरतीं
मर्दानी फेट्यावरतीं शोभती रुधिरमय पंक्ति
लाल लाल वक्षांवरतीं रुळतसे मुक्त-माला ती
अतिरथी प्रवेगें येवो
कुणि महारथीही येवो
तो मुक्तिविना ना राहो
ऐशा समरलीलेनें पळविला वीर विदुलेनें



हननोद्यत कर चंडीचा—नाचे नित शीर्षांवरती [ पान४२ ]

८

श्रीशिवभूपाल-भवानी तत्कर-खड्गात विराजे
शिवनेरीची शिवदेवी देहीं स्फूर्तीनें साजे
'हर हर' समरांगणनाद तत्कंठी मंगल गाजे

धारा-तीर्थाची जननी
भिजवी युद्धाची धरणी
करि पावन वीर-श्रेणी

मृत्यूच्या भेसुरतेनें पळविला वीर विदुलेनें

९

तरवार तिच्या जी हातीं विजयाची तीच पताका
धार जी तिच्या खड्गाची ती तद्दैवाची रेखा
मूठ जी तिच्या खड्गाची ती आशा-लतिका शाखा

झाशीची ग्वाल्हेरीची
संकल्पित जयकीर्तीची
चकमक झडली जोराची

अंतीं परि यशवंतीनें पळविला वीर विदुलेनें

१०

रजक जों कानीं येई मोर्चावर घोडा नेई
रण-कदन जेथें होई फळि फोडुन तेथें जाई

करि मारगिरीची घाई रडवी रिपु धाई धाई

शत्रूच्या भाळी तानें

तरवारीच्या टोकानें

अपजय लिहिला रक्तानें

संग्राम चतुर लक्ष्मीनें पळविला वीर विठुलेनें

११

जयकीर्ती चित्ती त्यजिली निज सैनिक समरीं त्यजिले

धन-दौलत नगरीं त्यजिली दारा सुत सदनीं त्यजिले

अपजयी " जयाजी " जीव-रक्षोनी मात्र पळाले

हिंदवी भूप खिस्तांत

दिलजान जाहला दोस्त

परि सर्व भरत-खंडात

जन वदती आश्चर्यानें "पळविला वीर विठलेनें !"

# ' राणीचा रणकल्लोळ ! '

संग्रामचतुर अशा झाशीच्या लक्ष्मीनें रावसाहेब पेशव्यास ग्वाल्हेरचा विजय मिळवून दिला, नाहीं तर काल्पीच्या पराजयानंतर ते पलायनाच्याच विचारात होते ! तथापि पेशव्यांनीं मागचा-पुढचा विचार न करितां ग्वाल्हेरीस स्वतःचा राज्यारोहण समारंभ आरंभिला व ब्राह्मणभोजनें सुरू केलीं ! याविषयीं राणीनें पेशव्यांची चांगली कानउघाडणी केली. ' आधीं फौजेचा नीट बंदोबस्त करा, इंग्रजी फौज लढाईस आल्यावाचून रहाणार नाहीं " असेंही तिनें सांगितलें; पण तिकडे कोणीच लक्ष दिलें नाहीं. तिच्या भविष्याप्रमाणें खरोखरच सर चार्लस नेपीयर व सर ह्यू रोज हे इंग्रज सेनापती ब्रि. स्मिथ, क. रेन्स, क. पेली अशा रणपटु सरदारासह ग्वाल्हेरपुढें दाखल झाले ! ह्यूरोजनें पहिल्या-त्याच धडाक्यानें पेशव्याची मुरारची लष्करी छावणी सर केली; तेव्हां कुठें हे युद्धाचा पोशाख चढवूं लागले ! सगळीच धावाधाव व पळापळ !

तात्याटोप्यानीं करुणमुद्रेनें राणीची प्रार्थना केली. ती सद्गदित होऊन म्हणाली----" भिऊं नका ! सर्व फौजा मुकाबल्यास काढा ! मी माझें कर्तव्य करितें, तुम्ही तुमचें कर्तव्य करा ! " जिकडे स्मिस्थ, रेन्स, पेली असे कसलेले योद्धे होते ती बाजू तिनें स्वीका-रिली. तिनें आपले मकराणी स्वार, लालवर्दीचे लोक व तुर्की सैन्य यांची विशिष्ट रचना करून रणकल्लोळ उडवून दिला. तो सायंकाळ पर्यंत चालला. शेवटीं त्या प्रबल आंग्लवीरांस दुसऱ्या बाजूनें पर-तून जावें लागलें !

१

ग्वाल्हेरीच्या विजयानें सर्वांना धुंदी भरली !
राज्याभिषेक करण्याची पेशव्यास घाई झाली !
लक्ष्मीचीं बोधक वचनें वाऱ्यावर वाहत गेलीं !
" जय जय " वदता सोत्कंठ
जेवती विप्र आकंठ
ये आंग्ल-चमूचा गोट
तो झाला अति विक्राळ राणीचा रणकल्लोळ

२

छावणी मुरारावरची चातुर्यानें रचलेली
ह्यूरोज धाडसी त्यानें धडकीसरसी सर केली !
युद्धाच्या पोषाखाचीं इकडे मग धांदल झाली !
" मोर्चे बांधा ! " कुणि ह्मणती
" तोफा डागा ! " कुणि ह्मणती
कुणि लक्ष्मीला विनवीती
राखी बाणीची वेळ राणीचा रणकल्लोळ

३

" अजि कर्तव्याची कास बांधावी प्रत्येकानें "
" अजि राष्ट्रभक्तिची शपथ पाळावी प्रत्येकानें "

'अजि भारतभूची लाज राखावी प्रत्येकानें "
"भाळावरची विधि-रेखा
कर्तव्यीं रमतां वाचा ? "
उपदेश असा लक्ष्मीचा
एकून गमे—' होईल राणीचा रणकल्लोळ '

४

हिंमतवानांचा छबिना सेनेच्या पुढच्या भागीं
मग लाल रिसालेवाले त्याची फळि जागोजागीं
माघ्याच्या रोखुन जागा तोफांचा कोट उभारी
सेनेची रचना ऐशी
करुनी सजली रणवेषीं
कळलें कीं प्रत्येकाशीं
हसवील अजि स्वर्गोल राणीचा रणकल्लोळ

५

ज्या जागीं इंग्रज गाझी तेथें समुख ही राणी !
जेथें धिप्पाड रिसाले त्या क्षेत्रीं ही सेनानी !
जिकडे रणपटु तलेना तेथ धैर्याची खाणी !
तिकडून वाजला बिगुल
इकडून-धडकले गोल

जीवित झाले बिनमोल
अद्भुत शौर्याचा खेळ राणीचा रणकल्लोळ

६

वाजतात पडघम ढोल बाजती कर्ण-तंबूर !
धडकती वार चौफेर गर्जती राक्षसी वीर !
सैनिकास सैनिक भिडले स्वाराला भिडले स्वार !
त्या चपलेची चपळाई
काटाकाटीची घाई
पाहून गमे नवलाई
मृत्यूचें केवळ मूळ राणीचा रणकल्लोळ

७

पहिली जी तुकडी आली ती सारी गारद झाली
मागची इंग्रजी तुकडी हुलकावणि देउन हटली
तुर्कांच्या बंदूकानीं तैं निशाणबाजी केली
सूतनाळ तोफा हातीं
घेऊन रिसाले चढती
फुगली मकराणी[१] छाती
जिकडे तिकडे तेजाळ राणीचा रणकल्लोळ

१ राणीचे मकराणी स्वार



" दौलतिच्या आधारांनो !- व्हा पुढे राष्ट्रभक्तांनो " (पान ४९.)

८

धावला पुढूनी 'स्मीथ' शौर्याची शर्थ करीत
'रेन्स' आणि 'पेली' मागें वळत झुकांड्या देत
राणीचे कांहीं लोक हटके भाषण मान्यांत
लागला 'रेन्स' पाठीला
तों खदक पुढतीं आला
'स्मिथ' अवसानाने चढला
दिसला त्याला घनघोर राणीचा रणकल्लोळ

९

रत्नखचित तलवारीची दृढ मूठ जिच्या हातात
अंगरखा नील तमामी भरघोस जिच्या अंगांत
जरतारीचा शिरपेंच शोभतो जिच्या शीर्षांत
वीर्योत्साहाची जननी
झांशीची लक्ष्मी राणी
रण-रंगीं गेली रमुनी
विस्मयात बुडवी खोल राणीचा रणकल्लोळ

१०

"झांशिच्या सत्पुत्रानों शाबास शूर मर्दानों"
"दौलतिच्या आधारांनों व्हा पुढें राष्ट्रभक्तांनों"
'आजि मृत्यूला कुणि नेणों कवि तुमची कीर्ति वानो'

उत्साहित करुनी सेना
चालली पुढें बल-हनना
करि परसेनेची छलना
उतरी शत्रूचा डौल       राणीचा रणकल्लोळ

११

आकाश शिरावर धुंद       भोंवतीं दिशाही धुंद
खालून उठे आक्रंद       नाचति योद्धे स्वच्छंद
सुटला न तिचा चमु-बंध    वाढे परि समरानंद
लेफ्टनंट कर्नल फिरले
बाजुला ब्रिगेडिर सरले
अंतरात खोंचून गेले
झाला न असा होईल       राणीचा रणकल्लोळ

१२

जो प्रसंग आठवतांच       आजही उरःस्थल फाटे
जो समय स्मरणीं येतां      अंगावर येती कांटे
जो काळ पुढें दिसताच     अंतरात भीती दाटे
त्या काळीं एकच ललना
प्रबलाच्या करि बलदमना
आश्चर्य गमे सकलांना
तो स्फूर्तिप्रद चिरकाल       राणीचा रणकल्लोळ

# “ शेवटची संग्रामलीला ! ”

महाराणी लक्ष्मीबाईनें ग्वाल्हेरच्या शेवटच्या युद्धांत पहिल्या दिवशी रणकल्लोळ उडवून दिल्यानंतर दुसऱ्या दिवशीं तिचे प्रतिपक्षी सर्व इंग्रज सरदार कृतनिश्चयानें विद्युत्प्रपातासारखे तिजवर तुटून पडले. प्रथम त्यांनीं आपल्या कवायती फौजा एका खोल दरींत लपविल्या व घोडदळाचा जबरदस्त हल्ला केला आणि मागून पायदळाचे एकामागून एक हल्ले चढविले. राणीनें जिवाचा धडः करून अघाडीवर मर्दुमकीची शर्थ केली. इतक्यात सर ह्यू रोज यानें निकराची चढाई करून पेशव्यांचे मोर्चे जिंकले. ती अवाई चोहोंकडे पसरतांच राणीचेही लोक मोर्चे सोडून पळाले. तेव्हां तिला आपली इतिश्री कळून चुकली. साहस व धाडस यांच्या जोरावर तिनें पुन्हा कृतांताप्रमाणें चवताळलेल्या शत्रूची फळी फोडिली ! तोंच हुजरे स्वारांची टोळी तिच्या मागें लागली ! एक दोन झटापटींत ती स्वारांना ठार करून पार निघाली ! पुन्हा तिची 'सुंदर' नांवाची दासी गोळीला बळी पडली. तिच्या भेदक किंकाळीसरसी घोडा फिरवून तिनें त्याही स्वारास कंठस्नान घातलें ! पण पुढें एक लहानसा नाला आला, तेथें तिचा तो नवा शिंदेशाही घोडा अडला ! झटकन् खालीं उतरून त्यास पैलतीरी नेण्याचा तिनें पुष्कळ यत्न केला, पण व्यर्थ ! इतक्यात हुजरे स्वारांची दुसरी टोळी येऊन तेथें भयंकर हातघाई झाली. तींत तिच्या डोक्यावर मर्मांतिक प्रहार होऊन कवटी विदीर्ण झाली व

त्याबरोबर एक नेत्रही बाहेर आला तोंच दुसऱ्या एकानें राणीच्या छातींत किराचीची हूण मारिली अशा विकलग स्थितींतही तिनें सफाईचा हात मारून त्या घातकी स्वारांस आपल्या आधीं स्वर्लोकीं पाठविलें ! नतर ती धरणीवर पडली तिचे विश्वासू सेवक रामचंद्रराव देशमुख हे तिच्या पुत्राचा सभाळ करीत घोडे-स्वार होऊन तिजबरोबर धांवत होते त्यांनीं त तर्डीने जवळच्या गंगादास बुवांच्या मठांतून गंगाजल आणून तिच्या मुखांत घातलें. तिनें एकवार आपल्या प्राणप्रिय मुलाकडे पाहिलें व स्वर्गारोहण केलें ! येथें या अद्वितीय राणीची " शेवटची संगरलीला " सपली

१

लक्ष्मीच्या शौर्याग्नीनें सतप्त अती झालेले
निर्धार जयांचा झाला जमले ते टोपीवाले
घायाळ जणो कीं व्याघ्र चवताळुन सारे आले

तो शत्रूचा रणरग
क्षण करी मनाला गुग
राणीचें धैर्य अभग

सजली तीही करण्याला शेवटची सगरलीला

२

हाल्लल्या कवायती सेना लपविल्या दरीत तयाना
तो हुजर्स घोडेस्वार फोडिती चहूं बाजूना

वाटले प्रभंजन लोट फाडितात दिक्पटलांना

यशवती सावध होती
जाणिली रिपूची युक्ती
तोंडावर चालून ये ती

आरंभच ऐसा झाला शेवटची सगरलीला

३

तोफांचा मारा झाला किति देह उडाले नकळे !
बंदुकिच्या फैरी झडल्या किति छात्या फुटल्या नकळे !
संगिनिचे हल्ले चढले किति कपाळ फुटलें नकळे !

शाबास तिच्या धैर्याची
शाबास तिच्या शौर्याची
वीरांहुन ढळली नव्हती

साश्चर्य करी शत्रूला शेवटची सगरलीला

४

ऐकता तिचा मुखशब्द सैन्यगोल हालत होता
दावितां खुणेचे बोट सेनागिरि उसळत होता
दावितां खुणेचें खड्ग मृत्यूशीं झुंजत होता

शर्तीस लागली शर्त
जयतर्क होय अवितर्क

मृत्युचा न भयसंपर्क
आणी रोमांच तनूला शेवटची संगरलीला

५

श्री वैकुंठाची रमणी की ब्रह्मांडाची माता
स्वर्गस्थाच्या आत्म्यांची शांतिप्रद गंगा-सरिता
प्रगटली इथें ती होती मृत्युलोकिं संगरानिरता
कंठी मोत्याचा घोंस
पाठीवर रुळती केंस
शरीरी युद्धाचा वेष
निर्भय खेळे ती चपला शेवटची संगरलीला

६

भ्रुकुटी वरतीं चढलेली डोळ्यात खून भरलेला
तलवार करी धरलेली रक्तांत देह भिजलेला
कमरबंद तो कसलेला आवेश अंगिं भरलेला
तोफांचे मोर्चे मागें
त्यापुढें झुंज ही लागे
दोघातून एक न भागे
ऐशी आली निकराला शेवटची संगरलीला



भ्रुकुटी वरती चढली–डोळ्यात खून भरला ( पान ५४ )

७

प्रत्येक भयानक लाट फिरविली कर्णधारेनें
प्रत्येक मर्द वीराला हटविला जवामर्दीनें
पेशव्यांकडीलचि मोर्चे सर केले ह्यूरोजानें

पसरता चहुकडे वार्ता
सैनिकात भय संचरता
एकेक पाय घे फिरता

मग कळून चुकलें तिजला शेवटची सगरलीला

८

अवसानच सुटलें ज्यांचें त्यांना मग कैचा धीर!
सदनेच्छू विद्रुत पक्षी कवण त्या करील स्थीर?
तलवारीच्या यत्नाला हांसले तदा तकदीर!

अवसानघातकी लोक
तोफा टाकुन कित्येक
फिरले जेव्हां बिनधोक

दावी तींही दैवाला शेवटची सगरलीला

९

झुंजार आँग्ल वीरानीं घातला गराडा भवती
चण्ड-मुण्ड कोपस्फुरित देवीस वधाया बघती

ती शौर्याग्नीची ज्वाला    कितिकांना जाळित होती
एकीमर पडतां घाले
भीषण रणकंदन चाले
साह्याला कोणि न आले
वैरिच उरले बघण्याला    शेवटची समरलीला

१०

कडकडून विद्युल्लौ    निमिषांत लकाकुन जावी
बघतांना वायू नौका    गगनांत उडोनी जावी
भरतीची भीषण लाट    क्षितिजाला भेदुन जावी
हुतुतूचा दावित खेळ
धूळीचे उडवित लोळ
वेढा फोडी तत्काळ
हाँ हाँ!' वदवी सकलाला    शेवटची संगरलीला

११

हय इतुक्या वेगें धावें    भूस्पर्श दिसेना त्याचा!
तें धाडस ती चपळाई    तो प्रकार आश्चर्याचा!
क्षण गेला जों स्तिमिताचा    साहस अवलोकायाचा—
सुटली स्वारांची टोळी
एकदां लगटही झाली



राणी लक्ष्मीबाई शत्रुसैन्याची फळी फोडून गेल्या.

समशेर तिनें भिजवीली

चकवी तिची काळाला    शेवटची सगरलीला

१२

फिरविला फेकला घोडा    वायूची चाले कन्या

भारत-मातेची कूस    जाहली तिजमुळें धन्या

कोणाची उपमा द्यावी    तिजसम कीं तीच अनन्या

आवडती 'सुंदर' दासी

बळि पडली ती गोळीशीं

लगटली दुष्ट वैऱ्याशीं

वर्णाया स्वर्गी गेला    शेवटची सगरलीला

१३

दुःखाला नव्हती जागा    शोकाला नव्हती वेळ

पुढच्याच पाउलीं दैवें    मांडिला भयानक खेळ

तो शिंदेशाही घोडा    अडला पाहून ओहोळ

उतरली त्वरेनें खालीं

युक्तिची शिकस्तहि झाली

घोडा तो पाय न उचली

तेथेंच कराया अडला    शेवटची सगरलीला

१४

अत्युग्र भीमकर्म्यांची दुसरी ललकारी आली !
दुर्धर स्थितींतच तेथें अबलेवर गर्दी झाली !
पाणिदार समशेरींचे आघात जाहले भालीं !

खड्गाचे चुकवित घाव
ज्याच्यावर घेई धाव
तत्काल कालवश होय

ऐशी भीषण विक्राळा शेवटची समरलीला ।

१५

खड्गाचा दृढ प्रहार मागून अचानक होई
शीर्षाचें शकल उडालें एक नेत्र बाहिर येई
किरचीच्या दुसऱ्या घायें वक्षःस्थल फुटुनी जाई

मारून सफाई हात
अतकास परलोकात
पाठवी अंत-कालांत

करुनी निजली धरणीला शेवटची समरलीला

१६

वाहून रक्त अनिवार देहाला ग्लानी आली
अंधारी येउन नेत्रीं कंठाला कोरड पडली

रणतीर्थी गंगातीर्थ लाधलें तिला त्यावेळी

सरक्षित होता पुत्र
एकदा पाहिला मात्र
शेवटीं झांकले नेत्र

दाउन गेली स्वर्गाला शेवटची सगरलीला

१७

तेजाची तारा तुटली शौर्याची ज्योती विझली
कीं जय-ध्वजा कोसळली स्वातंत्र्यश्री मावळली
आशेची मंगलमाला विच्छिन्न होउनी पडली

ही इतिहासाचीं पानें
वाचवती ना नयनानें
भिजताती अश्रुजलानें

स्फुरवी परि शाहीराला शेवटची सगरलीला

१८

रणलीला झाली जेथें रणशय्या केली जेथें
अजुनी जन दाविति तेथें 'लक्ष्मी निजली हो येथें!'
संग्रामाचीं तद्गीतें वनमाला अजुनी गातें

नद्यानांतरिचे सूर
जणुं औदास्याचे पूर
प्रगटिती अर्थ गंभीर

" यापुढें मजा गातील शेवटची समरलीला "

---

शाळांचे बक्षीससमारंभ आणि वाचनालयें यांजकरितां
मुंबई-इलाखा आणि वऱ्हाड-मध्यप्रांत सरकारांनीं मंजूर केलेल्या
— अजमासें एक हजार —

# "मंजूर पुस्तकांची जंत्री"

आमचेकडे छापून तयार आहे. किंमत ०८६ व पोष्टेज् ०८१

(१) डिस्ट्रिक्ट् व म्युनिसिपल् स्कूलबोर्डें, गावपंच व शाळा-मास्तर ह्यांना बक्षिस पुस्तकांच्या याद्या तयार करितांना जरूर तीं पुस्तकें निवडून घालण्यास ह्या जंत्रीचा अत्यंत उपयोग होतो.

(२) जंत्रींतलीं बहुतेक पुस्तकें आमच्या स्टॉक्मध्यें भरपूर व किफायतशीर मिळतील अशी सोय आहे. ह्यामुळें—

**आमचें ग्रंथभांडार हें विक्रीचें मोठें केंद्र बनलेलें आहे.**

(३ कारण—इतस्ततः वास्तव्य करीत असलेल्या शेंकडों ग्रंथकर्त्यांशीं व प्रकाशकाशीं पृथक्पृथक् पत्रव्यवहारानें थेट कायमचा संबंध निगडीत करून हजारों पुस्तकें विक्रीसाठीं एकेठिकाणीं जमविण्याचा पद्धतशीर प्रयत्न आमचा सतत चालू आहे व तो वाङ्मयाचे अभिवृद्धीला पोषक होणारा आहे.

(४) ह्या बक्षीस पुस्तकांवर वेगवेगळें कमिशन शें. १० पासून २५ पर्यंत ऑर्डरीच्या मानानें कमीज्यास्ती आम्ही देऊं शकतों. विशेष खुलासा पत्रद्वारें होईल.

**दत्तात्रय कंपनी "ग्रंथभांडार" जळगांव पू. खा.**

बृहन्महाराष्ट्रांतील यच्चयावत्

## मराठी ग्रंथलेखकांशीं व प्रकाशकांशीं

# महत्त्वाचें हितगुज

(१) जीं पुस्तकें आपण छापून प्रसिद्ध केलीं आहेत तीं आम्हीं विक्रयार्थ संग्रहीं ठेवल्यानें आपणा उभयतांचा फायदा होणार आहे. आपलीं पुस्तकें ज्यास्त खपावीं अशी आपली इच्छा असणारच.

(२) सार्वजनिक वाचनालयें, स्कूल्लायब्ररया, म्युनिसिपालिट्या व जिल्हास्कूलबोर्डें ह्यांचेकडून वरचेवर मागण्या येत रहातील असा आमचा प्रयत्न असतो. त्यासंबंधीं विशेष खुलाशाचीं माहितीपत्रकें आम्ही छापलेलीं आहेत तीं मागवून आपण आमच्याशीं वाङ्मय प्रसाराचे कामीं योग्य सहकार्य कराल अशी उमेद आहे.

(३) सालदरसाल मराठी वाङ्मयात उच्चदर्जा प्राप्त झालेलीं जीं भारदस्त व उपयुक्त पुस्तकें प्रसिद्ध होताहेत तेवढ्या सगळ्यांचें एक लिस्ट सार्वजनिक लायब्रऱ्यांचे उपयोगासाठीं छापून प्रसिद्ध करण्याचें आम्हीं मनांत आणिलेलें आहे.

(४) सदरहू लिस्टांत आपलीं पुस्तकें दाखल झाल्यास अनायासें प्रसिद्धीचें कार्य साधणार आहे. तरी इच्छा असल्यास तसें खुलासेवार कळविण्याची कृपा व्हावी. उत्तरास ०— चें तिकीट अवश्य पाठवावें.

**दत्तात्रय कंपनी " ग्रंथभांडार " जळगांव पू. खा.**

# श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेस

## जळगांव, पूर्व खानदेश.

छपाईचीं सर्व प्रकारचीं लहान मोठीं कामें एक अगर अनेक रंगात होतात. पुस्तक छपाईचीं कामेंही पुण्यामुंबईच्या तोडीचीं व माफक भावानें होऊन बाइंडिंग रूलिंग वगैरे कामेंही उत्कृष्ट केली जातात.

एन्. एम्. नेमाडे

मालक

REFBK-0003970

# काव्यकिरण-माला.

( स० व प्र०—मि का भोरटके )

अगाऊ त्रैवार्षिक वर्गणी ५॥ रु

या मालेंतून आजवर बाहेर पडलेले वाङ्मय काव्यरसिकास आनंद देणारें तर आहेच पण मराठी काव्याचा काळजीपूर्वक अभ्यास करणाऱ्यास तें अत्यंत उपयुक्तही आहे. सामाजिक, ऐतिहासिक सुंदर खंडकाव्यें, चित्रकाव्यें, स्फुटकविता, रसाळ अभंग, मार्मिक निबंध हिंदी काव्याचीं भाषांतरें अशा विविध प्रकारांनीं वरील वाङ्मयास शोभा आली असून त्यायोगानें मराठी भाषेंत महत्वाची भर पडली आहे. महाराष्ट्रियांनीं मालेस आश्रय देऊन असें वाङ्मय संग्रहीं ठेवणें जरूर आहे साडेपाच रुपये वर्गणींतून बारा आणे प्रवेश फी वजा जाता बाकीच्या पावणे पाच रुपयांची फेड दर तीन महिन्यांनी एक याप्रमाणें पुस्तकरूपानें केली जाईल. पुस्तकांची किंमत चार ते आठ आणे पर्यंत असते वर्गणीदारास पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळतें

मालेंतून आतांपर्यंत पुढील पुस्तकें नियमितपणें प्रकाशित झालीं आहेत

| | | |
|---|---|---|
| १ | महाराणा प्रतापसिंह ( खंडकाव्य ) ... .. | ०८ |
| २ | मान्यांची यमुना ( ) ... ... | ०६ |
| ३ | चंडीचतक ( चित्र काव्य संग्रह ) ... | ०१२ |
| ४ | कविता-वनिता (वनिता विषयक सुंदर कवितांचा संग्रह) | ०८ |
| ५ | कुमुद्वती ( स्फुट कविता ) ... .. | ०८ |
| ६ | शिवप्रताप (भूषण कवीच्या शिवाबावनीचें भाषांतर) | ०८ |
| ७ | मराठी कवि-बिरुद्ध प्रो० पटवर्धन ( निबंध ) | ०६ |
| ८ | अभंगमाला ( आवृत्ति दुसरी ) ... ... | ०७ |

हीं सर्व पुस्तकें श्री कवि तिवारी यांचीं आहेत

मि० का० भोरटके
जळगांव पूर्व खानदेश.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ३८७०

# तिवारींचीं पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| *१ | काव्यकुसुमांजली ( छापत आहे ) | | ०१० |
| २ | काव्यरत्नमाला | | २॥ |
| ३ | मनोहरलीला ( खंडकाव्य ) | | ०६ |
| *४ | प्रसन्नराधा | ,, | ०६ |
| *५ | महाराणा प्रतापसिंह | ,, ... | ०८ |
| ६ | मान्याची यमुना | ,, ... | ०६ |
| ७ | अभंगमाला ( आवृत्ति दुसरी ) | ... | ०७ |
| *८ | कविता—वनिता | ... | ०८ |
| ×९ | शिवप्रताप | ... ... | ०८ |
| ×१० | कुमुद्वती | ... ... | ०८ |
| ११ | मराठ्यांचीं संग्रामगीतें ( सचित्र आवृत्ति ५ वी ) | | १ |
| १२ | झांशीची संग्रामदेवता ( आवृत्ति तिसरी ) | | ०८ |
| *१३ | राधामाधव | ... ... | ०१० |
| १४ | चंडीशतक | | ०१२ |
| १५ | मराठी कवि विरुद्ध प्रो. वा. ब. पटवर्धन बी. ए. | | ०६ |

पहिलीं दहा पुस्तकें मुंबई विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत आणि त्याच दहा पुस्तकांस महाराष्ट्रग्रंथोत्तेजक मंडळ इंदूर या संस्थेनें बक्षिसें दिलीं आहेत

१।२।५।६।७।९।१० ह्या नंबरचीं बुकें नागपूर विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत.

* ह्या पुस्तकास दक्षिणाप्राइज कमेटीनें बक्षिसें दिलीं आहेत व × ह्या पुस्तकास शिफारसपत्रें दिलीं आहेत

सर्व पुस्तकें मिळण्याचे पत्ते.—

१ **दु० आ० तिवारी**, जळगाव पू. खा-

२ **परचुरे आणि मंडळी**, माधवबाग मुंबई न. ४


वंदे मातरम्